रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक १६४
www.ramprahar.com

◆ बुधवार, ३१ डिसेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## सोशल मीडियावरील अश्लील कंटेन्टबद्दल केंद्राचा इशारा



**नवी दिल्ली :** सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर वाढत्या अश्लील कंटेन्ट आणि आक्षेपार्ह मजकुराबाबत केंद्र सरकारने अत्यंत कठोर भूमिका घेतली आहे. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने जारी केलेल्या ताज्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार फेसबुक, इन्स्टाग्राम आणि 'एक्स' (पूर्वीचे ट्विटर) यांसारख्या सर्व सोशल मीडिया मध्यस्थांना त्यांच्या अंतर्गत देखरेख यंत्रणेचा पुन्हा आढावा घेण्याचे आदेश दिले आहेत. विशेषतः लैंगिक छळ किंवा कोणाच्याही वैयक्तिक गोपनीयतेचा भंग करणाऱ्या मजकुराबाबत तक्रार प्राप्त झाल्यानंतर २४ तासांच्या आत तो मजकूर हटवणे बंधनकारक आहे. कंपन्यांनी या इशाऱ्याकडे दुर्लक्ष केल्यास त्यांना केवळ आयटी कायद्यांतर्गतच नव्हे, तर भारतीय न्याय संहिता आणि इतर फौजदारी कायद्यांनुसार खटल्यांना सामोरे जावे लागेल.

## अंतरंग

नववर्षात कोकण रेल्वे मार्गावर जादा गाड्या/२

हुतात्मा स्तंभाचे सिद्धगड बलिदान दिनी लोकार्पण/५

रायगडात मुलींच्या क्रिकेट स्पर्धेला प्रारंभ/८

# पनवेलमध्ये भाजप महायुतीचे शक्तिप्रदर्शन

## महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारांचे अर्ज दाखल





(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्ष, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि आरपीआय (आठवले गट) महायुतीच्या अधिकृत उमेदवारांनी मंगळवारी (दि. ३०) नियोजित वेळापत्रकानुसार आपले उमेदवारी अर्ज शक्तिप्रदर्शनाने दाखल केले. विविध प्रभागांतील भाजप महायुतीच्या उमेदवारांनी निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात उपस्थित राहून कायदेशीर प्रक्रियेनुसार अर्ज सादर केले.

पनवेल महापालिका निवडणूक प्रभारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, महापालिका निवडणूक प्रमुख आमदार महेश बालदी, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या नेतृत्वाखाली उमेदवारी अर्ज निवडणूक अधिकाऱ्यांकडे दाखल करण्यात आले. या वेळी भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस व आरपीआय (आठवले गट) महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने महायुतीच्या उमेदवारांनी अर्ज दाखल केले. या वेळी महायुतीच्या सर्व वरिष्ठ नेत्यांनी उमेदवारांना शुभेच्छा देत पुन्हा एकदा मोठ्या विजयाचा विश्वास व्यक्त केला.

विकास, स्थैर्य आणि विश्वास या मुद्द्यांवर एकत्र आलेली ही महायुती पनवेलच्या राजकारणात निर्णायक ठरणार असल्याचे वातावरणातून स्पष्ट झाले. शिस्तबद्ध, शांततापूर्ण आणि लोकशाही मूल्यांचे पालन करत उमेदवारांनी अर्ज दाखल केले, परंतु जनतेचा उत्साह आणि कार्यकर्त्यांचा जोश दिसून आला.

पनवेल महापालिका क्षेत्रात विकासासाठी भाजप महायुतीने सातत्याने काम केले आहे. शहराचा सर्वांगीण विकास, नागरिकांच्या मूलभूत सुविधा, स्वच्छता, पायाभूत सोयीसुविधा, शिक्षण, विविध योजना, आरोग्य व पारदर्शक प्रशासन महापालिकेत पहायला मिळाले आहे. त्यामुळे पुन्हा एकदा पनवेलकर नागरिकांचा विश्वास आणि पाठिंबा महायुतीला निश्चित मिळणार आहे.

मागील कार्यकाळात भाजप महायुतीने पनवेल शहराचा सर्वांगीण विकास घडवून आणला आहे. दर्जेदार रस्ते, पायाभूत सुविधा, स्वच्छता व्यवस्था, शिक्षण व आरोग्य क्षेत्रातील सुधारणा, केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी तसेच पारदर्शक प्रशासनामुळे पनवेल हे विकासाचे मॉडेल शहर म्हणून उदयास आले आहे. विरोधकांकडे केवळ आरोपांचे राजकारण असताना महायुतीकडे विकासाचे ठोस काम आणि विश्वासार्ह नेतृत्व असल्याने पुन्हा महायुतीचीच सत्ता येणार असा नागरिकांकडून दुजोरा दिला जात आहे.

### महायुतीच्या उमेदवारांची प्रभागनिहाय नावे

**प्रभाग क्रमांक १ :** विजयश्री संतोष पाटील, लीना नंदकुमार म्हात्रे, नितेश बाळकृष्ण पाटील, संतोष बाबुराव भोईर
**प्रभाग क्रमांक २ :** काजल महेश पाटील, अरुणा किरण दाभणे, दिनेश रवींद्र खानावकर, कृष्णा सीताराम पाटील
**प्रभाग क्रमांक ३ :** मंजुळा गजानन कातकरी, प्रिती फुलाजी ठाकूर, निर्दोष गोविंद केणी, विनोद कृष्णा घरत
**प्रभाग क्रमांक ४ :** प्रवीण काळुराम पाटील, परेशा ब्रिजेश पटेल, अनिता वासुदेव पाटील, मधू पाटील
**प्रभाग क्रमांक ५ :** शत्रुघ्न अंबाजी काकडे, मिनल विजय पाटील, हर्षदा अमर उपाध्याय, प्रवीण रामजी बेरा
**प्रभाग क्रमांक ६ :** उषा अजित अडसुळे, नरेश गणपत ठाकूर, सोनल अजिंक्य नवघरे, समीर श्रीकांत कदम
**प्रभाग क्रमांक ७ :** अमर अरुण पाटील, मनाली अमर ठाकूर, प्रमिला रविनाथ पाटील, राजेंद्रकुमार दीपचंद शर्मा
**प्रभाग क्रमांक ८ :** बबन नामदेव मुकादम, रामदास शेवाळे, बायजा बबन बारगजे, सायली तुकाराम सरक
**प्रभाग क्रमांक ९ :** महादेव जोमा मधे, प्रतिभा सुभाष भोईर, दमयंती निलेश भोईर, शशिकांत शनिवार शेळके
**प्रभाग क्रमांक १० :** रवींद्र अनंत भगत, सरस्वती नरेश काथारा, मोनिका प्रकाश महानवर, विजय खानावकर
**प्रभाग क्रमांक ११ :** नीलम मयूर मोहिते, प्रदीप गजानन भगत, चरणदीप बळदेव सिंग
**प्रभाग क्रमांक १२ :** प्रभाकर कांबळे, विद्या प्रकाश तामखडे, कुसुम रवींद्र म्हात्रे, दिलीप बाळाराम पाटील
**प्रभाग क्रमांक १३ :** रवींद्र गणपत जोशी, विकास नारायण घरत, हेमलता रवी गोवारी, शिला भाऊ भगत
**प्रभाग क्रमांक १४ :** इक्बाल हुसेन काझी, सारिका अतुल भगत, सतीश दत्तात्रेय पाटील, रेणुका मयुरेश नेतकर
**प्रभाग क्रमांक १५ :** एकनाथ रामदास गायकवाड, सीता सदानंद पाटील, कुसुम गणेश पाटील, दशरथ बाळू म्हात्रे
**प्रभाग क्रमांक १६ :** संतोष शेट्टी, समीर बाळशेठ ठाकूर, राजेश्री महेंद्र वावेकर, कविता किशोर चौतमोल
**प्रभाग क्रमांक १७ :** मनोज कृष्णाजी भुजबळ, प्रकाश चंदर बिनेदार, अस्मिता जगदिश घरत, शिवानी सुनील घरत
**प्रभाग क्रमांक १८ :** नितीन जयराम पाटील, ममता प्रितम म्हात्रे, प्रिती जॉर्ज, स्नेहा अनिल शेंडे
**प्रभाग क्रमांक १९ :** राजू चुन्नीलाल सोनी, दर्शना भगवान भोईर, रूचिता गुरूनाथ लोंढे, सुमित उल्हास झुंझारराव
**प्रभाग क्रमांक २० :** अजय बहिरा, श्वेता सुनील बहिरा, प्रियांका तेजस कांडपिळे

## शिक्षक भरती प्रक्रिया आता महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडे

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील शिक्षक भरती महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडे सोपवण्याचा निर्णय राज्य सरकारने मंगळवारी (दि. ३०) घेतला. शिक्षण आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या सुकाणू समितीच्या मार्गदर्शनाखाली हे कामकाज होईल.

परीक्षा परिषदेचे अध्यक्ष हे या समितीचे अध्यक्ष असतील, तर परीक्षा परिषदेचे आयुक्त सदस्य सचिव असतील. याशिवाय इतर तीन सदस्य या समितीत असतील. पवित्र पोर्टलच्या माध्यमातून ही परीक्षा परिषद हे काम करेल. सध्या टीईटी अर्थात शिक्षक पात्रता परीक्षा या परिषदेकडून घेतली जाते.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद ही शालेय शिक्षण विभाग अंतर्गत कायद्याद्वारे स्थापित झालेली स्वायत्त संस्था आहे. या संस्थेमार्फत शिक्षक पात्रता परीक्षा, शिक्षक अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणी यासारख्या परीक्षांचे आयोजन केले जाते.

## मनपा निवडणुकीसाठी आज अर्जांची छाननी

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा मंगळवारी (दि. ३०) शेवटचा दिवस होता. बुधवारी (दि. ३१) या अर्जांची छाननी होणार आहे.

२ जानेवारी ही अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख आहे. ३ जानेवारीला निवडणूक चिन्हाचे वाटप होईल आणि अंतिम उमेदवार यादी प्रसिद्ध होईल. येत्या १५ जानेवारीला मतदान होणार, तर १६ जानेवारीला मतमोजणी होणार आहे.

निवडणूक आयोगाने निवडणुका जाहीर केलेल्या महानगरपालिकांपैकी २७ महापालिकांची मुदत संपली आहे, तर जालना आणि इचलकरंजी या दोन महानगरपालिका नवनिर्मित आहेत. या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज ऑफलाईन स्वीकारण्यात आले आहेत.

## निवडक

### बांगलादेशमध्ये आणखी एका हिंदूची हत्या, आरोपी अटकेत

**ढाका :** गेल्या काही काळापासून बांगलादेशमध्ये सुरू असलेली हिंदूंवर हल्ल्यांची मालिका सुरूच आहे. दीपू चंद्र दास आणि अमृत मंडल या हिंदू तरुणांच्या हत्यांना काही दिवस लोटत नाहीत, तोच मैमनसिंह येथे आणखी एका हिंदू व्यक्तीची हत्या करण्यात आली आहे. येथील कपड्यांच्या गिरणीत २२ वर्षीय आरोपी नोमन मियाँ याने शॉट गनच्या मदतीने गोळीबार करत ४२ वर्षीय बजेंद्र बिस्वास याचा जीव घेतला. या प्रकरणी आरोपीला अटक करण्यात आली आहे.

### युक्रेनचा पुतीन यांच्या निवासस्थानावर हल्ला

**मॉस्को :** युक्रेनने रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्या निवासस्थानावर हल्ला केला. 'रायटर्स'ने रशियाचे परराष्ट्रमंत्री सर्गे लाव्हरोव्ह यांच्या हवाल्याने दिलेल्या वृत्तानुसार युक्रेनने ९१ लाँग रेंज ड्रोन्स नोव्हगोर्ड भागात फायर केले. रशियाच्या एअर डिफेन्सने सर्व ड्रोन्स इंटरसेप्ट करून हा हल्ला हाणून पाडल्याचा दावा केला आहे. हल्ल्याबाबत भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी चिंता व्यक्त केली आहे.

## कर्जतच्या बेकरे गावात चार बकऱ्यांचा फडशा; बिबट्याचा संशय

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील बेकरे गावात पुन्हा एकदा हिंस्र प्राण्याने हल्ला करीत शेतकरी सुदाम मंगल कराळे यांच्या चार बकऱ्यांचा फडशा पाडला आहे. हा हल्ला बिबट्याने केल्याचा संशय आहे.

कराळे यांनी नेहमीप्रमाणे चरण्यासाठी रानात सोडलेल्या बकऱ्या सायंकाळपर्यंत परत आल्या नव्हत्या. मंगळवारी सकाळी गावालगतच्या जंगल परिसरात गळ्याभोवती पकडून अर्धवट खाल्लेल्या अवस्थेत बकऱ्यांचे मृतदेह आढळून आले. या घटनेने संपूर्ण गावात भीतीचे वातावरण पसरले आहे.

दरम्यान, कर्जत तालुक्यात बिबट्याच्या दहशतीबाबत सोशल मीडियावर आधीच चर्चा सुरू असताना बेकरे गावातील काही महिला कपडे धुण्यासाठी जंगलातील बंधाऱ्यावर गेल्या असता ही भयावह दृश्ये त्यांच्या निदर्शनास आली. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली.

विशेष म्हणजे या परिसरात याआधीही बिबट्याने बकऱ्या फस्त केल्याच्या घटना घडल्या असून त्या वेळी पायांचे ठसे आढळून आल्याने वनविभागाने बिबट्याचा वावर असल्याचा अंदाज व्यक्त केला होता. माथेरान घाट रस्त्यालगतचे घनदाट जंगल आणि वारंवार होणारे बिबट्याचे दर्शन पाहता या बकऱ्यांचाही बिबट्यानेच फडशा पाडल्याची शक्यता आहे. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पाहणी केली असून पंचनामा केला आहे.

शेतकरी सुदाम कराळे यांनी यापूर्वीही आपल्या बकऱ्यांचे नुकसान झाल्याचे सांगितले असून आता उरलेल्या चार बकऱ्यांचाही जीव गेल्याने त्यांच्यावर आर्थिक संकट कोसळले आहे. वनविभागाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात आणि नुकसानभरपाई जाहीर करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून पनवेलच्या उसर्ली परिसरात विकासकामे

### भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते लोकार्पण आणि भूमिपूजन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील उसर्ली परिसरात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नांमुळे जिल्हा वार्षिक योजनेच्या माध्यमातून मंजूर झालेल्या विविध विकासकामांचे सोमवारी (दि. २९) भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते लोकार्पण आणि भूमिपूजन करण्यात आले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेल्या सततच्या पाठपुराव्यामुळे या कामांसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध झाला असून यामुळे उसर्ली परिसराचा कायापालट होणार आहे. या सोहळ्यात प्रामुख्याने रस्ते आणि नागरी सुविधांच्या प्रकल्पांचे लोकार्पण करण्यात आले. यामध्ये एक कोटी रुपयांच्या जिल्हा वार्षिक निधीतून उसर्ली स्टॉप ते गावदेवी मंदिर या रस्त्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे तसेच दोन कोटी रुपयांच्या निधीतून बसेरा ते राजे शिवाजी संकुल सोसायटीपर्यंतच्या महत्त्वाच्या रस्त्याचे लोकार्पण करण्यात आले. याव्यतिरिक्त १० लाख रुपयांच्या निधीतून उसर्ली येथील रॅम व्ह्यू ते अंकित अपार्टमेंट या रस्त्याचे काम मार्गी लावण्यात आले असून या कामाचे भूमिपूजन आणि २५ लाख ६९ हजार रुपयांच्या जिल्हा वार्षिक योजनेतून बाजारपेठ विकास, सार्वजनिक दिवाबत्ती, बागबगीचे, उद्योग आणि अभ्यास केंद्र अशा विविध सोयीसुविधांचे लोकार्पण करण्यात आले. या सर्व कामांमुळे स्थानिक नागरिकांची मोठी गैरसोय दूर होणार आहे.

या कामांच्या शुभारंभावेळी माजी जि.प. सदस्य राजेंद्र पाटील, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, सरपंच नितीन भगत, सदस्य मुकेश भगत, माजी सदस्य मच्छिंद्र पाटील, संजय भगत, हेमंत भगत, प्रमोद पाटील, हरेश भगत, विनायक भगत, संदीप भगत, दीपक पाटील, वसंत भोईर यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.

# नववर्षाच्या स्वागतासाठी रायगड सज्ज

## जिल्हा प्रशासन आणि पोलीस यंत्रणाही सतर्क



(संग्रहित छायाचित्र)

**अलिबाग : प्रकाश सोनवडेकर**

सरत्या वर्षाला निरोप देण्याबरोबरच नववर्ष स्वागताचा आनंद लुटण्यासाठी पर्यटक मोठ्या संख्येने रायगडात दाखल झाले आहेत. ठिकठिकाणी पार्ट्यांचे आयोजन करण्यात आले आहे. हॉटेल्सही फुल्ल झाली आहेत.

कुठेही अनुचित प्रकार होऊ नये यासाठी रायगड जिल्हा प्रशासन आणि पोलीस यंत्रणेनेदेखील खबरदारी घेतली आहे. बीच पेट्रोलिंगचे नियोजन करण्यात आले आहे. पार्ट्यांवर पोलिसांचा वॉच असेल. वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी जिल्ह्यातील काही मार्गांवर ३१ डिसेंबर रोजी अवजड वाहनांच्या वाहतुकीस बंदी घालण्यात आली आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाने आतापर्यंत २३ पार्टी परवाने मंजूर केले आहेत. कायदा सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने पोलीस यंत्रणेने आवश्यक ती खबरदारी घेतली आहे. पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी सर्व पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यांची बैठक बोलावून आढावा घेतला व आवश्यक त्या उपाययोजनेच्या सूचना दिल्या आहेत. समुद्र किनारी टवाळखोर मुले फिरणार नाहीत, दारू पीत बसणार नाहीत यासाठी सागरी सुरक्षा दलाला सोबत घेऊन बीच पेट्रोलिंगचे नियोजन करण्यात आले आहे.

रात्रीच्या वेळी समुद्र किनारी नववर्ष स्वागतासाठी मोठी गर्दी होत असते. यात महिला आणि मुलीही असतात. त्यांच्याशी छेडछाड होऊ नये यासाठी दामिनी पथक सक्रिय झाले असून त्यांचीदेखील गस्त राहणार आहे.

दारू पिऊन गाडी चालवण्याचे प्रकार बऱ्याच ठिकाणी घडतात. त्यातून अपघात होण्याची भीती असते. हे लक्षात घेऊन पर्यटनस्थळी गस्तीवर असणाऱ्या पोलीस पथकांकडे ब्रेथ ॲनालायझर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. पहाटेपर्यंत नाकाबंदी सुरू राहणार असून यात दारू पिऊन गाडी चालवणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाणार आहे.

वाढत्या पर्यटकांमुळे रस्त्यावर वाहनांची वर्दळदेखील वाढणार आहे. त्यामुळे वाहतूक कोंडीची शक्यता आहे. मुंबई-गोवा महामार्गावर माणगाव आणि इंदापूर, तर अलिबाग-वडखळ मार्गावर पेझारी ही हमखास वाहतूक कोंडीची ठिकाणे आहेत. माणगाव आणि इंदापूर येथे जादा पोलीस बंदोबस्त तैनात असतील. शिवाय रायगड पोलीस आणि महामार्ग पोलीस यांच्या समन्वयाने वाहतूक कोंडी टाळण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत, तर अलिबाग-वडखळ मार्ग नो ओव्हरटेकिंग झोन जाहीर करण्यात आला आहे.

### ■ जड-अवजड वाहनांना वाहतूक बंदी

स्थानिक नागरिकांसह पर्यटकांचा प्रवास सुखकर व्हावा व अपघात टळावेत यासाठी रायगड जिल्ह्यातील काही मार्गांवर ३१ डिसेंबर रोजी अवजड वाहनांच्या वाहतुकीस बंदी घालण्यात आली आहे. खारपाडा ते कशेडी (मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६), माणगाव-ताम्हाणी घाटमार्गे दिघी (रा.मा. क्र. ७५३-फ), कर्जत-पळसदरी-खोपोली-पाली फाटा-वाकण (रा.मा. ५८४-अ), वडखळ-अलिबाग (रा.मा. १६६-अ), चौक फाटा-कर्जत राज्यमार्ग, अलिबाग-मुरूड राज्यमार्ग व अलिबाग-मांडवा या महामार्ग व राज्यमार्गांवरून ३१ डिसेंबर सकाळी ८ ते १ जानेवारी रात्री १२ वाजेपर्यंत जड-अवजड वाहनांना वाहतूक बंदी असेल.

> **थर्टीफर्स्ट आणि नववर्ष स्वागतासाठी येणाऱ्या पर्यटकांची असुविधा टाळण्यासाठी पोलीस प्रशासनाने आवश्यक ती खबरदारी घेतली आहे. सर्व प्रभारी अधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन नियोजन करण्यात आले आहे. अनुचित प्रकार करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. पर्यटक आणि स्थानिकांनी दुसऱ्याला त्रास न होता नववर्ष स्वागताचा आनंद घ्यावा.**
> **-आंचल दलाल,** पोलीस अधीक्षक

## मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर अपघातात दोघांचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर पनवेल तालुक्यातील आदई गावाजवळ रांग बदलणाऱ्या कंटेनरमुळे झालेल्या अपघातात इनोव्हा मोटारीतील दोघांना आपले प्राण गमवावे लागले, तर अन्य प्रवासी जखमी झाले आहेत. हा भीषण अपघात सोमवारी मध्यरात्री घडला.

मुंबईच्या दिशेने भरधाव वेगात जाणाऱ्या एका कंटेनरने अचानक रांग बदलली. त्याच वेळी मागून येणाऱ्या इनोव्हा मोटारीला कंटेनरच्या बाजूला जोरदार धडक बसली. या अपघातात सांगली येथील रहिवासी ४५ वर्षीय अरुण कचरे आणि ४० वर्षीय तुळसा पवार यांचा मृत्यू झाला असल्याची माहिती खांदेश्वर पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक शैलेंश भद्रे यांनी दिली. अपघाताच्या वेळी इनोव्हा मोटारीत एकूण सात प्रवासी होते. हे सर्व प्रवासी सांगली येथून कळंबोलीकडे प्रवास करत होते.

अपघातात इनोव्हा मोटारीतील अन्य दोन प्रवाशांना किरकोळ दुखापत झाली, तर तीन प्रवाशांना मुका मार लागल्याचे पोलिसांनी सांगितले. जखमींना तत्काळ उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे समजते. या अपघातप्रकरणी कंटेनरचालक चंदु प्रकाश याला पोलिसांनी ताब्यात घेऊन नोटीस देण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

# 'प्रति रायगड' पर्यटनासाठी कुडपण विकासाचा पण केलाय -ना. गोगावले



**पोलादपूर : प्रतिनिधी**

डोंगरदऱ्यांतून कुडपण गावातील निसर्गसौंदर्य पाहात आलो तेव्हा शाकाहारी विठ्ठलभक्तांच्या या गावाचा कायापालट करण्यासाठी गांव दत्तक घेणार असल्याचा मनोदय नानजीभाई खिमजीभाई ठक्कर तथा 'ठाणावाला' यांनी व्यक्त केला. कुडपण गावाचे ऐतिहासिक आध्यात्मिक तसेच पर्यटनदृष्ट्या महत्व लक्षात घेता उपमुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे यांच्या सहकार्याने 'प्रति रायगड' पर्यटनासाठी कुडपण विकासाचा 'पण' केल्याचा ठाम निर्धार राज्याचे रोहयो, खारजमीन आणि फलोत्पादन मंत्री भरतशेठ गोगावले यांनी व्यक्त केला.

कुडपण बुद्रुक येथे श्रीकाळकाई, वाघजाई, मानाई देवी आणि श्रीहनुमान मंदिराच्या प्रांगणातील अलिशान मंडपामध्ये आयोजित सुवर्णमहोत्सवी अखंड हरिनाम सप्ताहाच्या शुभारंभप्रसंगी उद्योजक राहुल पवार, भाजप मुंबई महामंत्री सागर पवार, कुडपण सरपंच अविनाश चिकणे, पुणे ग्रामस्थ समिती अध्यक्ष पांडूरंग चिकणे, मुंबईतील अशोक चिकणे, शंकर चिकणे, जावजीबुवा चिकणे तसेच मान्यवरांच्या उपस्थितीत उद्योजक नानजीभाई खिमजीभाई ठक्कर तथा 'ठाणावाला' यांचा पुणेरी पगडी, उपरणे आणि ज्ञानेश्वरीग्रंथ देऊन सत्कार करण्यात आला. तत्पूर्वी, नानजीभाईंनी कुडपण गावांतील मंदिरे आणि भिमाची काठी येथील पर्यटन विकासाची सद्यस्थितीची पाहाणी केली. भिमाच्या काठी सुळक्यावर शंकर आणि मारूतीच्या विराट मुर्ती बसविण्याची ग्वाही नानजीभाईंनी दिली. दुपारी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे कोकण अध्यक्ष आणि पोलादपूरचे ज्येष्ठ पत्रकार शैलेश पालकर यांचा तसेच जिजाऊ शैक्षणिक सामाजिक संस्थेचे पदाधिकारी संतोष मोरे, शिवाजी साळवी तसेच वैद्यकीय अधिकारी यांचा उपरणे आणि ज्ञानेश्वरी ग्रंथ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी बोलताना पत्रकार पालकर यांनी, पत्रकार आणि ग्रामस्थांच्या पाठपुरावा व प्रयत्नांतून सामाजिक, राजकीय व्यक्ती तसेच लोकप्रतिनिधींना जनतेच्या गैरसोयी व गरजांची माहिती होऊन विकासाला चालना मिळत असल्याचा अनुभव कुडपणच्या टप्प्या टप्प्याने होणाऱ्या विकासामुळे आला असून सुवर्णमहोत्सवी हरिनाम सप्ताहात नानजीभाई खिमजीभाई ठक्कर तथा 'ठाणावाला' यांनी गाव दत्तक घेतल्यामुळे कुडपणच्या विकासाचे सुवर्णयुग सुरू होणार असल्याचा आशावाद व्यक्त केला. यावेळी जिजाऊ शैक्षणिक सामाजिक संस्थेचे पदाधिकारी संतोष मोरे यांनी सप्ताहकाळात कुडपणमध्ये आरोग्य सेवा देत असल्याची माहिती दिली.

पाच वर्षांनी एक मत मागतो आणि दुप्पटीने देतो- मंत्री गोगावले यांचे आवाहन मिनी महाबळेश्वर कुडपण बुद्रुक व कुडपण खुर्द परिसरामध्ये 'प्रति रायगड' साकारण्यासाठी शिवछत्रपतींचा मेघडंबरीचा पुतळा तसेच पहिल्या कुडपणमधील काळकाई व तिसऱ्या कुडपणमधील भराडीदेवीचे मंदिर पर्यटन विकासातून विशेष निधीची उपलब्धता देणार असून एका वर्षात सातारा जिल्हा हद्दीचा कोंडूशी गावापर्यंतचा रस्ता ३ किमीपर्यंत पूर्ण झाला असून पुढील कामासाठी आवश्यक निधी ४-५ कोटींची उपलब्धता करून देईपर्यंत काम सुरूच राहणार आहे. पोलादपूरपासून कुडपणपर्यंत येण्याचा रस्ता पुन्हा करणार आहे. ज्याप्रमाणे शिवाजी महाराजांसोबत मुसलमान होते तसा आमच्या सोबत जमीर धामणकर हा कॉन्ट्रॅक्टर आहे. तो काम निष्ठेने पूर्ण करतोय, असे गौरवोदगार मंत्री भरतशेठ गोगावले यांनी यावेळी बोलताना व्यक्त केले. याप्रसंगी मंत्री गोगावले यांनी आम्ही कुडपणसाठी काही केले असेल तरच आम्हाला जसा आशीर्वाद दिला तसा पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या उमेदवारांनाही द्या, असे आवाहन केले.

याप्रसंगी व्यासपिठावर श्रीगणेशनाथ महाराज संस्थानचे तपोनिधी स्वानंद सुखनिवासी अरविंदनाथ महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा सहसंपर्कप्रमुख चंद्रकांत कळंबे, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, संपर्कप्रमुख किशोर पवार, विभागप्रमुख सतीश शिंदे, विजय शेलार, अनिल दळवी, अविनाश शिंदे, प्रभाकर पवार, हनुमंत शेलार, वसंत शेलार, नारायण साने, उद्योजक रामदास कळंबे, रस्त्याच्या कामाचे ठेकेदार सह्याद्री कन्स्ट्रक्शन्सचे जमीर धामणकर तसेच अन्य पदाधिकारी मान्यवर होते.

# नवीन वर्षात कोकण रेल्वे मार्गावर जादा गाड्या



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन वर्षात प्रवाशांची अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी उत्तर पश्चिम रेल्वेच्या विशेष ट्रेन धावणार असून रायगडसह कोकण रेल्वे मार्गावरील प्रवाशांना या ट्रेन्सचा लाभ घेता येणार आहे.

या विशेष ट्रेनमध्ये ट्रेन क्रमांक ०९७०१ खातीपुरा - मडगाव जंक्शन विशेष २८ डिसेंबर २०२५ (रविवार) रोजी खातीपुरा येथून १६:५० वाजता सुटेल. ही ट्रेन तिसऱ्या दिवशी ०४:४० वाजता मडगाव जंक्शनला पोहोचेल. ट्रेन क्रमांक ०९७०२ मडगाव जंक्शन - खातीपुरा स्पेशल ही ३० डिसेंबर २०२५ (मंगळवार) रोजी सकाळी ५:४० वाजता मडगाव जंक्शन येथून सुटेल. ही ट्रेन दुसऱ्या दिवशी दुपारी ४:१५ वाजता खातीपुरा येथे पोहोचेल.ही गाडी जयपूर जंक्शन, किशनगड, अजमेर जंक्शन, बिजयनगर, भिलवाडा, चित्तौडगढ, रतलाम जंक्शन, वडोदरा जंक्शन, सुरत, वसई रोड जंक्शन, पनवेल जंक्शन, रोहा, माणगाव, खेड, चिपळूण, संगमेश्वर रोड, रत्नागिरी रोड, रत्नागिरी रोड, वाळवा रोड, कानडाळवा रोड, राजवाडा रोड सावंतवाडी रोड, थिविम आणि करमाळी स्टेशन या ठिकाणी थांबेल.

या ट्रेनमध्ये एकूण २० एलएचबी कोच - २ टायर एसी - ०२ कोच, ३ टायर एसी ०८ कोच, ३ टायर एसी (इकॉनॉमी) ०२ कोच, स्लीपर -०४ कोच, सेकंड सीटिंग ०२ कोच, जनरेटर कार - ०२ राहाणार आहेत. दरम्यान, सध्या पर्यटन हंगाम सुरु झालेला आहे. प्रवासीही विविध राज्याराज्यात प्रवासाचा आनंद लुटत आहेत. त्यांना रेल्वेचाच प्रवास सुरक्षित आणि सुखकर वाटत असल्याने त्यांची पहिली पसंती रेल्वेला असल्याचे दिसत आहे.

यामुळे रेल्वेला वाढती मागणी आहे.नाताळ आणि नववर्ष स्वागताच्या निमीत्ताने प्रवाशांची वाढती गर्दी विचारात घेवून, कोकण रेल्वे मार्गावरुन धावणाऱ्या दक्षिण रेल्वेने आपल्या ट्रेनमध्ये कायमस्वरूपी अतिरिक्त कोच वाढवण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती कोकण रेल्वे प्रशासनाने दिली आहे.

या ट्रेनमध्ये २२६२९ / २२६३० तिरुनेलवेली दादर - तिरुनेलवेली एक्सप्रेस (साप्ताहिक) ट्रेनमध्ये २ टायर एसी- ०१, ३ टायर एसी०१, ३ टियर (इकॉनॉमी) - ०१, स्लीपर -०६, सामान्य - ०४, जनरेटर कार - ०१, एसएलआर - ०१ असे एकूण १५ कोच राहाणार आहेत.



**खोपोली : येथील शिवसेना शिंदे गटाचे कार्यकर्ते मंगेश काळोखे यांच्या हत्येनंतर दुःखाच्या गर्तेत असलेल्या काळोखे कुटुंबाला धीर देण्यासाठी अलिबाग मुरूड मतदारसंघाचे आमदार महेंद्र दळवी यांनी काळोखे कुटुंबाची भेट घेत सांत्वन केले. पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

# शेवग्याच्या शेतीतून होणार महिला सक्षमीकरण



**महाड : रामप्रहर वृत्त**

रायगडच्या पायथ्याशी, रस्त्याविना आणि सुविधांविना असलेल्या सांदोशीसारख्या दुर्गम गावात २० महिलांनी एकत्र येऊन शेवग्याच्या शेतीतून स्वतःच्या भवितव्याची पेरणी करुन ग्रामीण महिला सक्षमीकरणाची खरी सुरुवात केली आहे

महाड तालुक्यातील रायगडच्या पायथ्याशी वसलेल्या अत्यंत दुर्गम अशा सांदोशी गावात २८ डिसेंबर रोजी एक शांत पण अर्थपूर्ण बदल घडून आला. विश्वरूप प्रतिष्ठानच्या माध्यमातून गावातील वीस महिलांनी एकत्र येत शेवग्याच्या रोपांचे वाण स्वीकारले आणि सामूहिक शेतीचा निर्धार केला. महाडहून स्कुटीने दीड तासांचा खडकाळ प्रवास, पाचाडनंतर अर्धा तासाचा अवघड रस्ता, वाड्यांवर मोजकी घरे आणि मूलभूत सुविधांचा अभाव या सगळ्या अडचणी असूनही या महिलांचा आत्मविश्वास आणि तयारी पाहून उपस्थितांना समाधान वाटले.

या उपक्रमासाठी कृष्णा सरकले यांनी पुढाकार घेऊन महिलांना एकत्र आणले. शेवग्याची लागवड कशी करावी याबाबत कृष्णा सोनावले यांनी महिलांना आधीच मार्गदर्शन केले होते. त्यांच्या मार्गदर्शनामुळे महिलांनी स्वतःच्या मेहनतीने लागवडीसाठी खड्डे खणून तयार ठेवले होते. शंभर टक्के रोपे जगवण्याचे आश्वासन देणाऱ्या मेहनती आणि जिद्दी महिलांची निवड केल्याबद्दल कृष्णा सोनावले यांचे विशेष आभार मानण्यात आले.विश्वरूप प्रतिष्ठानच्या माध्यमातून महाड तालुक्यातील सांदोशी गावात पहिल्यांदाच शेवग्याच्या रोपांचे वाटप करण्यात आले. पंचायत समिती स्तरावर या गावाबद्दल माहिती घेतली असता, तेथे कोणताही बचत गट नसल्याची नोंद आढळली. गावाचे सरपंच आदिवासी असूनही, रस्त्यांचा अभाव असलेले हे गाव पर्यावरणदृष्ट्या समृद्ध आहे. अशा परिस्थितीत वीस महिलांनी एकत्र येऊन शेवग्याची ग्रुप शेती करण्याचा घेतलेला निर्णय हा निश्चितच प्रेरणादायी आहे.

या वेळी मीनल बुटाला यांनी महिलांना शेतीविषयक प्राथमिक माहिती देत शेवग्याची रोपे वाटप केली. याच भेटीदरम्यान महिलांनी पपई शेतीबाबतही उत्सुकतेने माहिती विचारली. शिकण्याची तयारी, पुढे जाण्याची इच्छा आणि एकत्र काम करण्याची जिद्द पाहून समाधान व्यक्त करण्यात आले.

# पनवेल महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आढावा बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, निष्पक्ष व शांततेत पार पडावी यासाठी आज दिनांक ३० डिसेंबर महापालिका मुख्यालयात सर्व विभागाची बैठक घेण्यात आली. निवडणूक अधिकारी तथा आयुक्त मंगेश चितळे यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आलेल्या या बैठकित निवडणूकीच्या अनुषंगाने सुरू असलेल्या सर्व कामांचा आढावा घेण्यात आला.



येत्या १५ जानेवारीला निवडणूक होणार असून या पार्श्वभुमीवरती ईव्हीएम मशीनची तपासणी, त्यासाठीचे मनुष्यबळ, याचा आढावा घेऊन सोयी सुविधांच्या अमंलबजावणी बाबत आयुक्तांनी सूचना दिल्या. तसेच पनवेल महानगरपालिकेची निवडणूक सुरळीतपणे पार पाडावी यासाठी निवडणूक प्रक्रियेत सहभागी असलेल्या सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांना आवश्यक प्रशिक्षण आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाटयगृहात सुरू आहे.

याबाबतचा आयुक्तांनी माहिती घेतली. तसेच निवडणूकीच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या विविध पथकांच्या कामकाजाचा यावेळी आढावा घेण्यात आला. तसेच निवडणूकी संबधित येणाऱ्या तक्रारींच्या निवारणाबाबत आयुक्तांनी मार्गदर्शन केले. निवडणूक काळात शांताता राखण्याच्यादृष्टीने अवैध दारू वाहतूक, अवैध वस्तू वाहतूक याबाबतीत आढावा घेताना आयुक्तांनी सांगितले की पोलिस विभाग, वाहतूक पोलिस व परिवहन विभागाशी समन्वय राखून काम करण्याबाबत सांगितले. तसेच निवडणूकीसाठी लागणाऱ्या साधनसामुग्रीच्या नियोजनाबाबत यावेळी चर्चा करण्यात आली. प्रत्येक निवडणूक निर्णय कार्यालय व मतदान केंद्रावरती लागणाऱ्या सोयी सुविधांबाबत माहिती घेऊन सूचना दिल्या.

# महावितरण दैनंदिनी २०२६चे प्रकाशन

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

महावितरणच्या २०२६ या वर्षाच्या दैनंदिनीचे मंगळवारी मुंबईतील फोर्ट येथील एचएसबीसी कार्यालयात उत्साहात प्रकाशन करण्यात आले. अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्या शुभहस्ते ही दैनंदिनी प्रकाशित करण्यात आली.




याप्रसंगी संचालक (संचालन/प्रकल्प) श्री. सचिन तालेवार, संचालक (वित्त) श्री. अनुदीप दिघे, संचालक (वाणिज्य) श्री. योगेश गडकरी, संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार, स्वतंत्र संचालक श्री. विश्वास पाठक आणि संचालिका श्रीमती ज्योती चिमटे यांची प्रमुख उपस्थिती होती. केवळ तारखा आणि वार पाहण्यासाठीच नव्हे, तर प्रशासकीय कामात सुसूत्रता आणण्यासाठीही दैनंदिनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. या दैनंदिनीमध्ये महावितरणच्या राज्यभरातील क्षेत्रीय कार्यालये व अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक, महावितरणची वाटचाल व कामगिरी यांच्या माहितीचा समावेश आहे. या दैनंदिनीमुळे कामकाजात समन्वय राखणे सोपे होणार आहे.

प्रकाशनानंतर, लोकेश चंद्र यांनी उपस्थित सर्वांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या आणि ही दैनंदिनी महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी उपयुक्त ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. दैनंदिनी प्रकाशित केल्याबद्दल आभा शुक्ला, लोकेश चंद्र यांनी जनसंपर्क विभागाचे अभिनंदन केले.

# पालीतील प्रतीक जाधवची 'नासा'मध्ये कामगिरी

**पाली : प्रतिनिधी**

रायगड मधील सुधागड-पाली येथील प्रतीक अरुणा प्रकाश जाधव याने Astro स्वीपर संघाचे दमदारपणे नेतृत्व करून दरवर्षी पार पडणाऱ्या NASAच्या जागतिक इव्हेंटमध्ये २०२५ ग्लोबल Winner म्हणून दमदार कामगिरी केली आहे. त्याच्या या कृतीने सुधागड पालीच्या शिरपेचातही मानाचा तुरा खोवला गेला आहे.



या स्पर्धेत तब्बल १८,८६० संघाचा सहभाग असून १६७ देशातील १,१४,०९४ स्पर्धक सहभागी झाले होते. भारतातील ISROसह १४ स्पेस एजन्सी पार्टनर असून यात प्रतीक जाधव याचा संघ Astro Sweepers यांनी २०२५ Global Winner असे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक जिंकले आहे. त्यामधून ग्लोबल टॉप टेन टीमची निवड करण्यात आली व त्या टॉप टेनमधून प्रथम क्रमांकाचा भारतीय इनोव्हेटरच्या Astro स्वीपर्स टीमने गॅलॅक्टिक इम्पेक्ट विजेतेपद पटकावले आहे.

नासा इंटरनॅशनल स्पेस चैलेंज हा जगातील सर्वात मोठ्या नाविन्यपूर्ण हॅकेथॉनपैकी एक आहे. गॅलॅक्टिक इम्पेक्ट हा पुरस्कार जागतिक स्तरावर मोठ्या प्रमाणात सकारात्मक बदल घडवून आणू शकतात, अशा टीमला दिला जातो. या पुरस्काराचे मानकरी प्रतीक जाधव व त्याची टीम ठरली आहे. या टीमने ASTRO स्वीपर रिस्क इंडेक्स नावाचा एक समग्र स्कोरिंग फ्रेम वर्क विकसित केला आहे. प्रतीकने भारताचे जागतिक स्तरावर प्रतिनिधित्व करून प्रथम पारितोषिक मिळवले असल्याने Astro स्वीपर संघाचे सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# माणगावमध्ये पं.स.च्या जुन्या इमारतींना अखेरची घरघर

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी उभ्या असलेल्या जुन्या पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारती आज अक्षरशः अखेरच्या श्वासावर आहेत. एकेकाळी प्रशासनाच्या गजबजाटाने न्हाऊन निघालेल्या या इमारती आज ओसाड,जीर्ण आणि भयावह अवस्थेत उभ्या राहिल्या असून शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या निधीची उघडउघड उधळपट्टी होत असल्याचे विदारक चित्र दिसून येत आहे.



विविध विभागांसाठी इमारत अपुरी पडत असल्याने तहसील कार्यालयाच्या प्रशासकीय संकुलाजवळ अत्याधुनिक व सुसज्ज पंचायत समिती कार्यालय उभारण्यात आले. तत्कालीन मंत्री व विद्यमान खासदार सुनील तटकरे यांच्या प्रयत्नांतून हा भरीव निधी उपलब्ध झाला. परिणामी सर्व शासकीय कार्यालये एकाच ठिकाणी आल्याने सामान्य नागरिकांची कामे अधिक सुलभ, जलद आणि पारदर्शक झाली. त्याचवेळी जुन्या पंचायत समितीच्या इमारतींकडे झालेले दुर्लक्ष मात्र प्रशासनाच्या संवेदनशून्यतेचे जिवंत उदाहरण ठरत आहे. आज जुन्या पंचायत समितीच्या आवारात उभ्या असलेल्या इमारती केवळ नावापुरत्याच अस्तित्वात आहेत. काही ठिकाणी पाणीपुरवठा योजना आणि आरोग्य विभागाची कार्यालये कार्यरत असली, तरी सर्व शिक्षा अभियान, बचतगट कार्यालये, गट साधन केंद्र, कृषी विभाग, बांधकाम विभाग अशा अनेक महत्त्वाच्या इमारती अक्षरशः जीर्ण झालेल्या अवस्थेत आहेत. छत गळत आहे, भिंतींना तडे गेले आहेत, लोखंडी सळया उघड्या पडल्या आहेत. कधीही इमारत कोसळण्याची भीती नागरिकांच्या मनात आहे. दुर्दैवाची बाब म्हणजे अनेक शासकीय कार्यालये आजही खाजगी इमारतींमध्ये कोट्यवधी रुपयांचे भाडे देऊन चालवली जात आहेत.

# अवैध दारू तस्करीवर करडी नजर

## निवडणूक, नववर्ष स्वागताच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभाग ॲक्शन मोडमध्ये

**पनवेल : वार्ताहर**

निवडणुक तसेच नववर्ष स्वागताच्या पार्श्वभूमीवर अवैध दारू विक्री आणि वाहतूक रोखण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने कंबर कसली आहे. त्यासाठी विशेष भरारी पथकांची स्थापना करण्यात आली आहे. विनापरवाना पार्ट्यांचे आयोजन केल्यास कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे तसेच वाहनांची तपासणी करण्याच्या सूचनाही दिल्या आहेत.



पनवेल महारनगरपालिका निवडणूकच्या पार्श्वभूमीवर आणि नववर्ष स्वागतासाठी अनेकदा बेकायदा, छुप्या पद्धतीने पार्ट्या आयोजित केल्या जातात. अशा पार्ट्यांवर राज्य उत्पादन शुल्क विभागाची नजर राहणार आहे. त्याचप्रमाणे हातभट्टीच्या दारूची विक्री रोखण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. उत्पादन शुल्क विभागामार्फत जिल्ह्यात पाच कार्यकारी निरीक्षक आणि दोन भरारी निरीक्षक पथके कार्यरत करण्यात येणार आहे. जिल्ह्यात मद्यविक्रीमध्ये परराज्यातील मद्य विक्री होणार नाही याबाबत खबरदारी घेण्यात येणार आहे.

नववर्ष स्वागतासाठी विनापरवाना पाट्यांचे आयोजन करणाऱ्यांवर कारवाई केली जाईल. दारू पार्टीसाठी परवानगी असणे आवश्यक आहे. एकदिवसीय परवाना न घेता विनापरवाना मद्यविक्री होत असल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करणार असल्याचे संकेत राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक रविकिरण कोले यांनी दिले आहेत. तसेच कारवाई टाळण्यासाठी एकदिवसीय परवाना घेऊनच आयोजन करावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

पनवेल तालुका पोलिसांद्वारे खारपाडा, कोन, नेरे येथे नाकाबंदी असणार आहे. तर पनवेल वाहतूक शाखेतर्फे आदई सर्कल, ठाणा नाका गार्डन हॉटेल सिग्रल, शिवशंभो नाका पनवेल, बडघर नाका, उरण नाका ब्रिज या ठिकाणी नाकाबंदी करण्यात येणार आहे.

पनवेल तालुका पोलिसांतर्फे दोन पीआय, आठ पीएसआय/एपीआय, ४८ पोलीस स्टाफ असे एकूण ५८ पोलीसांचा वॉच राहणार आहे तर पनवेल वाहतूक शाखेचे तीन ऑफिसर आणि २० स्टाफ या वेळी विविध ठिकाणी हजर राहणार आहेत.

# कळंबोलीत राजस्थानी व हरियाणा मूळ रहिवाशांचा स्नेहमेळावा उत्साहात

## आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



राजस्थानी सामाजिक विकास संस्था आणि हरियाणा निवासी संघाच्या संयुक्त विद्यमाने कळंबोली येथील नवी मुंबई पोलीस मुख्यालयाच्या बहुउद्देशीय सभागृहात भव्य सामाजिक-पारिवारिक सोहळा रविवारी उत्साहात झाला. हा कार्यक्रम केवळ औपचारिक आयोजनापुरता मर्यादित न राहता विविध समाजघटकांना एकत्र आणणारा, आपुलकी, एकोपा व सामाजिक सलोखा वृद्धिंगत करणारा भावनिक मिलन सोहळा ठरला.

कळंबोली परिसरात मोठ्या प्रमाणात राजस्थान आणि हरियाणामधील मूळ रहिवासी स्थायिक झालेले आहेत. वाहतूक आणि इतर व्यवसायामध्ये गेल्या अनेक वर्षांपासून अनेक कुटुंब कार्यरत आहेत. वेगवेगळ्या सण, उत्सवामध्ये ते एकत्र येतात. या सर्वांना संघटित करण्याचे काम माजी नगरसेवक राजेंद्र शर्मा यांनी केले आहे. रविवारी आयोजित करण्यात आलेल्या स्नेहमेळाव्याला समाजातील सर्व वयोगटातील नागरिक, महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. एकमेकांशी संवाद, स्नेहभोजन, अनुभवांची देवाणघेवाण आणि सांस्कृतिक जिव्हाळा यामुळे हा कार्यक्रम खऱ्या अर्थाने कुटुंबवत्सल ठरला.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. आपल्या भाषणात त्यांनी सामाजिक संघटनांची भूमिका, परस्पर सहकार्याचे महत्त्व आणि एकत्रित प्रयत्नांतून समाजबांधणी कशी साध्य होते यावर सखोल भाष्य केले. विविध प्रांतातून आलेल्या समाजबांधवांनी एकत्र येऊन सामाजिक ऐक्याचा संदेश देणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

या स्नेहमेळाव्यास भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, मंडळ अध्यक्ष अमर पाटील, महाराष्ट्र प्रदेश वाहतूक संघटनेचे अध्यक्ष प्रभूदास भोईर, रविनाथ पाटील, माजी नगरसेविका प्रमिला पाटील, मनाली ठाकूर यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. उत्तर भारतीय संघाचे अध्यक्ष, राजस्थानी संघाचे अध्यक्ष, हरियाणा संघाचे अध्यक्ष तसेच विविध सामाजिक, सांस्कृतिक व सेवाभावी संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निस्वार्थ भावनेने समाजातील प्रत्येक घटकाला मदत करून सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या राजेंद्र शर्मा यांचा आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. समाज एकत्रीकरणासाठी केलेल्या प्रयत्नांचे, संघटन कौशल्याचे आणि शर्मा यांच्या सेवाभावी वृत्तीचे उपस्थितांनी कौतुक केले. कार्यक्रमादरम्यान सामाजिक ऐक्य, परस्पर सहकार्य, संस्कृती जपणूक आणि भावी पिढीसाठी मजबूत समाजरचना उभारण्याचा संदेश देण्यात आला. अशा प्रकारचे पारिवारिक व सामाजिक उपक्रम समाजातील दरी कमी करून आपुलकी वाढवतात, असे मत वक्त्यांनी व्यक्त केले.

एकता, प्रेम, सामाजिक बांधिलकी आणि सांस्कृतिक समृद्धीचा संदेश देणारा हा भव्य पारिवारिक सोहळा उपस्थित सर्वांच्या मनात एक अविस्मरणीय क्षण ठरला असून भविष्यातही अशा उपक्रमांचे आयोजन करण्याचा संकल्प आयोजकांनी या वेळी व्यक्त केला.



## निवडक

### ट्रॅव्हल बॅगमधून गांजा जप्त

**पनवेल :** रेल्वेस्थानकात ट्रॅव्हल बॅगेमध्ये गांजा लपवून घेऊन आलेल्या एका इसमाला पनवेल रेल्वे पोलिसांनी संशयावरुन अटक केली आहे. सुरेंद्र चौहान (वय ३४) असे त्याचे नाव असून रेल्वे पोलिसांनी त्याच्याकडील सहा किलो ३८५ ग्रॅम वजनाचा गांजा जप्त केला आहे. पनवेल रेल्वे पोलिसांचे पथक रेल्वे स्थानकात गस्त घालत असताना, फलाट क्रं.६/७ वर तो संशयास्पदरित्या फिरताना आढळला.

### महिलांनी चोरली सोन्याची बांगडी

**पनवेल :** तालुक्यातील महात्मा गांधी रोडवरील राजेंद्र कांतीलाल बांठिया ज्वेलर्स या सराफ दुकानात बुरखा परिधान करून आलेल्या दोन महिलांनी हातचलाखीने सोन्याची बांगडी लांबवल्याची घटना घडली. चोरट्यांनी मोराच्या डिझाइनची सुमारे २५ ग्रॅम वजनाची सोन्याची एक बांगडी चोरून नेल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणी दुकानाचे मालक गिरीश राजेंद्र बांठिया यांनी पनवेल शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, त्यानुसार अज्ञात महिलांविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक हजरत पठाण अधिक तपास करीत आहेत.

# फुंडे विद्यालयात शैक्षणिक साहित्य निर्मिती



**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य बी.बी.साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली विज्ञान व गणित शैक्षणिक साहित्य निर्मिती उपक्रम करण्यात आला.

विद्यालयात विज्ञान व गणित विषय अधिक सोप्या व रोचक पद्धतीने समजावने या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या विविध मॉडेल व प्रयोगाचे प्रदर्शन केले. विद्यार्थ्यांनी गणित व विज्ञानातील संकल्पना प्रत्यक्ष कृतीतून मांडल्या पुनर्वापराच्या साहित्याचा वापर करून तयार केलेल्या मॉडलांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

शैक्षणिक साहित्य निर्मिती पाचवी ते सातवी गटातील २८ विद्यार्थी व आठवी ते दहावीच्या गटातील २४ विद्यार्थी सहभागी झाले होते. इयत्ता पाचवी ते सातवी विज्ञान क्रमांक अनुक्रमे अनन्या भुंडकर, श्रवण गोरे, श्रेया खामकर इयत्ता ५वी ते ७वी, गणित क्रमांक अनुक्रमे आदिती घोडके, दूर्वा गुट्टे, आयुष मोरे इयत्ता ८वीते १० वी गणित क्रमांक अनुक्रमे, पृथ्वीराज शिंदे, उमा शाह, अमृता राजभर इयत्ता८वी ते १०वी विज्ञान क्रमांक अनुक्रमे जाधव संकेत, नैतिक भोईर, दीक्षा तांबडकर. उपक्रमास उपशिक्षिका डी. जी पाटील, व्ही. व्ही गावंड, ए.एम पाटील, एम. एम खारपाटील, उपशिक्षक एस. डी म्हात्रे, एस. डी नाईक, एम. आर पाटील, विज्ञान व गणित शिकवणारे शिक्षक यांचे महत्त्वाचे योगदान लाभले.

# महिला उद्योग मंडळाच्या शाळेचे सुयश



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

अल्काईल अमाईन्स व चावणे हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने चावणे हायस्कूल येथे आयोजित अल्काईल अमाईन्स अंतर शालेय क्रिडा महोत्सव २०२५मध्ये महिला उद्योग मंडळाची प्राथमिक शाळा पराडे या शाळेने ११ सांघिक तर आठ वैयक्तिक क्रिडा प्रकारात बक्षिसे मिळवून दुसरा क्रमांक पटकावला.

या यशाबद्दल सर्व विद्यार्थी आणि शिक्षकांचे शाळा आणि संस्थेच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. यात १२ वर्षाखालील लंगडी मुले प्रथम क्रमांक, मुली द्वितीय क्रमांक; १४ वर्षाखालील लंगडी मुले द्वितीय क्रमांक, मुली प्रथम क्रमांक; १४ वर्षाखालील व्हॉलीबॉल मुले प्रथम क्रमांक; १४ वर्षाखालील खोखो, मुले द्वितीय क्रमांक, मुली प्रथम क्रमांक; १४ वर्षाखालील रस्सीखेच, मुले प्रथम क्रमांक, मुली द्वितीय क्रमांक;१४ वर्षाखालील डॉजबॉल मुले द्वितीय क्रमांक १२ वर्षाखालील डॉजबॉल मुले प्रथम क्रमांक


तर १२ वर्षाखालील ८० मी. धावणे मुली निधी म्हात्रे द्वितीय, १२ वर्षाखालील १५० मी. धावणे मुली श्रीशा दहिफळे तृतीय, १२ वर्षाखालील ८० मी. धावणे मुले मयांक वाघे द्वितीय, १२ वर्षाखालील १५० मी. धावणे मुले आरव गायकवाड प्रथम, १४ वर्षाखालील २०० मी. धावणे मुली सान्वी शिर्के प्रथम, १४ वर्षाखालील १०० मी. धावणे मुले श्रीयोग नांगडे द्वितीय, १४ वर्षाखालील २०० मी. धावणे मुले जय गायकवाड द्वितीय, १४ वर्षाखालील थाळी फेक मुले कुंदन दरडे द्वितीय यांनी सूयश संपादन करून शाळेचे मोहोपाडा महिला उद्योग मंडळाच्या शाळेचे नावलौकीक केले.

# पनवेल परिसरात हंगामी भाज्यांची आवक वाढली

**पनवेल : वार्ताहर**

थंडीचे दिवस सुरू होताच रायगड जिल्ह्यातील विविध भाजी मार्केटमध्ये हंगामी भाज्यांची चांगलीच आवक वाढली आहे. दरम्यान, गावठाण आणि ग्रामीण भागातून पोपटीसाठीच्या वालाच्या शेंगा मोठ्या प्रमाणात पनवेल बाजारात दाखल झाल्या आहेत.

शेतकरी सकाळी लवकरच आपला ताजा भाजीपाला थेट बाजारात आणत असल्याने वालाच्या शेंगा-ताज्या व दर्जेदार मिळत आहेत. थंड हवामान या शेंगांच्या पिकासाठी पोषक ठरत असून यंदा उत्पादनात वाढ झाली आहे. पनवेल बाजारात वालाच्या शेंगांसोबतच घेवडा, गवार, चवळी अशा इतर हंगामी शेंगांचीही आवक वाढली आहे.



बाजारात विविध प्रकारच्या शेंगा उपलब्ध झाल्याने गृहिणींमध्ये खरेदीची चांगलीच लगबग दिसून येत आहे. सध्या वालाच्या शेंगांना मागणी जास्त असून दरही स्थिर असल्याची माहिती विक्रेत्यांनी दिली.

स्थानिक उत्पादनाला चांगला भाव मिळत असल्याने शेतकरी वर्गही समाधान व्यक्त करत आहे. हवाळी भाज्यांमुळे पनवेलच्या भाजी बाजारात पुन्हा एकदा गजबजलेपणाचे चित्र पाहायला मिळत आहे.


# उरणमध्ये नवीन वर्षाच्या स्वागतासाठी जोरदार तयारी

## हॉटेल्स, रिसॉर्ट, फार्महाऊसचे बुकिंग हाऊसफुल्ल

**उरण : प्रतिनिधी**

उरणमध्ये सरत्या वर्षाला अलविदा आणि नववर्षाच्या स्वागताची आतापासूनच तरुणाईची जोरदार तयारी सुरू झाली आहे. त्यामुळे तरुणाईने आखलेल्या एन्जॉयमेंटच्या प्लानमुळे परिसरातील सर्वच हॉटेल्स, रिसॉर्ट, फार्म हाऊस दहा दिवसांपूर्वीच बुक झाल्याने हाऊसफुल्ल झाली आहेत. नवीन जनरेशन मधील युवा-युवतींना सण, सुट्टी मिळण्याचा अवकाश एन्जॉय करण्याचा एकही संधी वाया घालविण्यासाठी तयार होत नाहीत. उलट वेळ, काळ मिळेल तेव्हा एन्जॉय करण्यास सदैव तत्पर असतात.

आज ३१ डिसेंबर २०२५ या सरत्या वर्षाला अलविदा करण्याचा दिवस आहे. या वेळी सकाळपासून पहाटेपर्यंत डीजेच्या तालावर संगीत, नाच, गाण्यांवर जल्लोष करण्यात तरुणाई व्यग्र राहणार आहेत. लागलीच नवीन वर्षाच्या स्वागतासाठी सज्ज होणार आहेत. यासाठी तरुणाईने आधीपासूनच मौजमजा



करण्याचे बेत आखले आहेत. मौजमजा करण्यासाठी तरुणाई बरोबरच सर्वांसाठी उरणचा परिसर उपयुक्त ठिकाण आहे. येथील रानसई धरण, वेश्वी, विंधणे, आक्का देवीचा डोंगर, इंद्रायणी डोंगर, करंजा परिसर, ऐतिहासिक द्रोणागिरी डोंगर, जेएनपीए परिसर, टाऊनशिप आदी अनेक ठिकाणे तरुणाईची अगदी पसंतीची आहेत. त्याच बरोबर पीरवाडी दर्गा पिरवाडी, माणकेश्वर येथील समुद्राचा फेसाळणारा किनारा, रुपेरी वाळू हौशी पर्यटक व तरुणाईला सदैव साद घालीत असते.

याचबरोबर मोरा-मुंबई घारापुरी दरम्यान शितल चांदण्या आणि समुद्र सफरीचा आनंद घेण्यासाठीही दरवर्षी हौशी पर्यटकांची विशेष रेलचेल असते. सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी, सरत्या वर्षाच्या स्वागतासाठी आणि रात्रभर समुद्र सहलीचा आनंद घेण्यासाठी तरुणाई फारच उत्सुक झाली आहे. यासाठी अनेक बोटींचे बुकिंगही झाले असल्याचे बोट मालकांकडून सांगितले जात आहे.

उरणच्या किनाऱ्यावर आणि परिसरात अनेक हॉटेल्स, रिसॉर्ट,फार्म हाऊस आहेत. कुटुंबियांसह मौजमजा करण्यासाठी असलेल्या या ठिकाणी नेहमीच गर्दी असते. विशेषता सीफुड, फ्रेश सीफुड स्थानिक खाद्य पदार्थ आणि इतर आवडीचे रुचकर खाद्य पदार्थ आर्डरप्रमाणे किफायतशीर दरात उपलब्ध करून देण्यात येत आहेत. यामुळे ही सर्वच ठिकाणे दहा दिवसांपूर्वीच बुक झाल्याने हाऊसफुल्ल झाली असल्याचे व्यावसायिकांकडून सांगितले जात आहे.

यामुळे सरत्या वर्षाला निरोप, अलविदा आणि नवीन वर्षाच्या स्वागतासाठी सज्ज झालेल्या तरुणाईचा जल्लोष पाहाण्याची उत्सुकता सर्वांनाच लागून राहिली आहे.

# बाजारात कांद्याचे दर स्थिर

## आवक वाढल्याने ग्राहकांना दिलासा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वाशी येथील घाऊक भाजीपाला बाजारात सध्या कांद्याची आवक मोठ्या प्रमाणावर होत असल्याने भाव स्थिरावले आहेत. महाराष्ट्रासोबतच मध्य प्रदेशमधूनही कांद्याची आवक सुरू झाल्यामुळे बाजारातील मागणी सहजपणे पूर्ण होत आहे. मागणीच्या तुलनेत पुरवठा अधिक असल्याने आगामी काही दिवस कांद्याच्या भावात वाढ होण्याची शक्यता नसल्याचा अंदाज व्यापाऱ्यांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे सर्वसामान्य ग्राहकांना काहीसा दिलासा मिळाला आहे.

वाशीतील घाऊक कांदा-बटाटा बाजारात दररोज सरासरी ८० हून अधिक वाहनांमधून कांद्याची आवक होत आहे. सध्या बाजारात कांदा २७ ट्रक व ५६ टेम्पोमधून येत असून, एकूण ८३ वाहनांद्वारे कांद्याचा पुरवठा होत आहे. तर बटाट्याची आवक २८ ट्रक व १६ टेम्पोमधून होत असून, एकूण ४४ वाहनांद्वारे बटाटे बाजारात दाखल होत आहेत. हिवाळ्याच्या हंगामात महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात ओला कांदा बाजारात येतो. ओला कांदा साठवणुकीदरम्यान



खराब होण्याचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे चांगल्या सुक्या कांद्याचे भाव वाढतात. यंदा परिस्थिती वेगळी असून, ओल्या कांद्याबरोबरच मध्य प्रदेशमधून दर्जेदार सुका कांदाही मोठ्या प्रमाणात बाजारात दाखल होत आहे. त्यामुळे एकूणच कांद्याची उपलब्धता वाढली असून, बाजारात तुटवड्याची परिस्थिती निर्माण झालेली नाही.

सध्या घाऊक बाजारात कांद्याचे भाव प्रतिकिलो १० ते २० रुपयांच्या दरम्यान असून बटाट्याचे भाव १० ते १५ रुपयांपर्यंत आहेत. आवक अशीच सुरू राहिल्यास हे भाव काही दिवस स्थिर राहतील, असा विश्वास घाऊक व्यापारी दिंगबर राऊत यांनी व्यक्त केला आहे. दर स्थिर राहिल्यामुळे किरकोळ बाजारातही त्याचा सकारात्मक परिणाम दिसून येण्याची अपेक्षा असून, गृहिणींसह हॉटेल व्यावसायिकांनाही दिलासा मिळणार आहे.

# बेलापूर ते पेंधरदरम्यान मेट्रोची नवीन वर्षाच्या निमित्ताने विशेष सेवा

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

नवीन वर्षाच्या निमित्ताने प्रवाशांच्या सोयीकरिता, सिडकोतर्फे मेट्रो मार्ग क्र. १ बेलापूर ते पेंधर दरम्यान बुधवार, ३१ डिसेंबर २०२५ ते गुरुवार, १ जानेवारी २०२६ रोजी मध्य रात्री १.३० वाजेपर्यंत मेट्रोची विशेष सेवा चालविण्यात येणार आहे. या कालावधी दरम्यान बेलापूर व पेंधर टर्मिनल येथून दर २० मिनिटांनी मेट्रो धावणार आहे. शेवटची मेट्रो बेलापूरहून मध्य रात्री १.३० वाजता तर पेंधर येथून मध्य रात्री १ वाजता रवाना होईल. उर्वरित कालावधीमध्ये नेहमीच्या वेळापत्रकाप्रमाणे मेट्रो धावणार आहे.

# ग्रामीण भागातील रिसॉर्टला पसंती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी ग्रामीण भागातील रिसॉर्टला पर्यटकांची पसंती दिसून येत आहे. पनवेल परिसरातील ग्रामीण भागात आणि खासकरून दुर्गम भागात डोंगराच्या पायथ्याशी आता छोटे मोठे रिसॉर्ट आणि होम-स्टे झाले आहेत. या होम-स्टेमध्ये शहरी भागातील पर्यटक मोठ्या संख्येने आले आहेत.



सध्या पर्यटनाचा हंगाम सुरू असल्याने पर्यटकांची पावले अलिबाग आणि मुरूडकडे वळत आहेत, मात्र पनवेल परिसरातील निसर्गाच्या सान्निध्यात असलेल्या ग्रामीण भागातील रिसॉर्टलादेखील मुंबई, पुणे, नाशिक येथील पर्यटकांकडून खास पसंती देण्यात आली आहे. निसर्गरम्य वातावरण, हिरवीगार वनराई, राहण्याठी अत्याधुनिक खोल्या, स्विमिंग पूल, जेवणाची उत्तम सोय या सर्व सोयीमुळे पर्यटक ग्रामीण भागातील रिसॉर्ट आणि होम- स्टेला पसंती देताहेत. पनवेलमधील नेरे, कर्नाळा, सुकापूर, वावंजे या भागातील हॉटेल आणि रिसॉर्ट जानेवारीच्या पहिल्या आठवड्यापर्यंत हाउसफुल्ल झाली आहेत.

### पोपटीच्या शेंगांची भुरळ

**ग्रामीण भागात तयार होणाऱ्या वालाच्या आणि पावट्याच्या शेंगा त्यासोबत अंडी, चिकन, बटाटा हे पोपटीसोबत रात्रीच्या वेळी गरम गरम खाण्यासाठी उपलब्ध होत असल्याने मुंबई आणि पुण्यातून नववर्ष स्वागतासाठी येणाऱ्या पर्यटकांना याची भुरळ आहे.**


## संपादकीय


# राजकीय पोकळी व हिंसा

निवडणुकांच्या तोंडावर खलिदा झिया यांचे निधन झाल्यामुळे याचा बांगलादेशातील नव्या राजकीय समीकरणांवर काय प्रभाव पडेल याचे अंदाज आता राजकीय विश्लेषकांकडून लावले जात आहेत. शेख हसीना यांच्या अवामी लीगवर घालण्यात आलेल्या बंदीच्या पार्श्वभूमीवर बांगलादेशात कट्टर इस्लामी संघटना जमात–ए–इस्लामी प्रबळ होत चालली आहे. अवामी लीगला बाहेर ठेवून घेतल्या जाणाऱ्या निवडणुकीला सर्वसमावेशक तरी कसे म्हणता येणार?

**बांगलादेशच्या पहिल्या महिला पंतप्रधान खलिदा झिया यांचे दीर्घकालीन आजारानंतर मंगळवारी सकाळी निधन झाले. १९८१ मध्ये त्यांचे पती आणि राष्ट्राध्यक्ष झियाउर रहमान यांच्या हत्येनंतर त्या राजकारणात आल्या. झियाउर रहमान यांचा बांगलादेशच्या स्वातंत्र्यलढ्यात सहभाग होता व १९७७ मध्ये ते बांगलादेशचे राष्ट्राध्यक्ष होते. त्यांच्यानंतर खलिदा झिया या बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीच्या अध्यक्षा बनल्या. तसेच तीन वेळा त्या बांगलादेशच्या पंतप्रधान होत्या. १९९१ साली बांगलादेशातील लष्करी राजवट संपुष्टात आल्यानंतर देशात निवडणुका झाल्या व बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीच्या उमेदवार खलिदा झिया या देशाच्या पहिल्या महिला पंतप्रधान झाल्या. मृत्यूसमयी त्या ८० वर्षांच्या होत्या. त्यांचे पुत्र तारिक रेहमान हे नुकतेच तब्बल १७ वर्षांच्या ब्रिटनमधील वास्तव्यानंतर बांगलादेशात परतले आहेत. मायदेशी परतल्यापासून त्यांनी पक्षाचे काम पहायला सुरूवात केली आहे. सध्या ते पक्षाचे कार्यकारी अध्यक्ष असून खलिदा झिया यांच्या निधनानंतर रेहमान हेच पक्षाचे नवे अध्यक्ष होण्याची शक्यता आहे. बांगलादेशात अवघ्या दीड महिन्याने म्हणजे १२ फेब्रुवारी रोजी सार्वत्रिक निवडणुका आहेत. देशात नवीन राजकीय समीकरण मांडण्याचे आश्वासन रेहमान यांनी बांगलादेशी जनतेला दिले आहे. परंतु रेहमान यांना खलिदा झिया यांचे राजकीय वारसदार म्हणून पक्षात तसेच राष्ट्रीय राजकारणात पूर्णपणे स्वीकारले जाणे तितकेसे सोपे नाही. सध्या त्यांच्या पक्षात गटबाजी होण्याची चिन्हे दिसत आहेत. बांगलादेशातील ताज्या घडामोडींनंतर देशातील लोकांच्या अपेक्षांना तोंड देण्याचे मोठे आव्हान रेहमान यांच्यासमोर आहे. खलिदा झिया यांच्या निधनामुळे सहानुभूतीच्या लाटेचा फायदा त्यांना कितपत मिळतो हे लवकरच स्पष्ट होईल. २०२६ मध्ये होणारी बांगलादेशातील सार्वत्रिक निवडणूक ही गेल्या तीन दशकांतील अशी पहिलीच निवडणूक असेल ज्यात ना खलिदा झिया असतील ना बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना. शेख हसीना यांची सत्ता देशातील तरुणांच्या आंदोलनाने उलथवून टाकल्यापासून त्या भारताच्या आश्रयाला आल्या आहेत. शेख हसीना आणि खलिदा झिया या दोघींच्या अनुपस्थितीत होणाऱ्या बांगलादेशातील आगामी निवडणुकीत कोणती नवी राजकीय समीकरणे जुळून येतात याकडे सगळ्यांचेच लक्ष आहे. निवडणुकांच्या तोंडावर अलीकडच्या काळात त्या देशात घडलेल्या घटना या अराजकतेचेच दर्शन घडवणाऱ्या होत्या. तिथले जनआंदोलन काहीसे विरले असून या आंदोलनातून जन्माला आलेली नॅशनल सिटिझन पार्टी अननुभवी नेत्यांमुळे दिशाहीन भासते आहे. अवामी लीगवरील बंदीमुळे बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीसोबतच जमात–ए–इस्लामी सारख्या कट्टर इस्लामी संघटनेला मोकळे रान मिळाले आहे. अलीकडच्या काळात तेथील सर्वसामान्य नागरिकांची मूलभूत सुरक्षितताही संकटात आली असून निवडणुका शांततामय वातावरणात पार पडणे कठीण दिसते आहे. बांगलादेशाने यापूर्वीही राजकीय पोकळीतून निर्माण झालेली हिंसा व अराजक अनुभवले आहे. आता पुन्हा एकदा त्या देशातील लोकशाही व्यवस्था संकटात दिसते आहे. बांगलादेशातील सध्याची परिस्थिती भारतासारख्या शेजारी देशाच्याही चिंतेत वाढ करणारी ठरते आहे.**

# चंद्रयान-३ : 'इस्त्रो'ची मुहूर्तमेढ रोवणारे विक्रम साराभाई





भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात 'इस्त्रो'ची मुहूर्तमेढ डॉ. विक्रम साराभाई यांनी रोवली होती. म्हणूनच त्यांना 'भारतीय अंतराळ युगाचे शिल्पकार' असंही म्हटलं जातं. त्यांचा स्मृतिदिन साजरा झाला.

भौतिकशास्त्र आणि खगोलशास्त्रात विपुल संशोधन केलेल्या डॉ. विक्रम साराभाई यांचा जन्म १२ ऑगस्ट १९१९ रोजी अंबालाल साराभाई आणि सरलादेवी साराभाई दाम्पत्याच्या पोटी झाला. गुजरातमधील अहमदाबाद हे त्यांचं मूळ गाव. साराभाई कुटुंब अगदी सधन आणि संपन्न होतं.

डॉ. विक्रम साराभाई यांच्यासह एकूण आठ भावंडं. त्यामुळे त्यांची आई सरलादेवी यांनी मुलांच्या शिक्षणासाठी मॉंटेसरी पद्धतीची शाळा सुरू केली. डॉ. विक्रम साराभाईंचं सुरुवातीचं शिक्षण इथंच झालं.

कुटुंबातील कुणीही राजकारण किंवा समाजकारणात सक्रियपणे कार्यरत नसलं, तरी साराभाई कुटुंबाचं आणि तत्कालीन राजकीय, सामाजिक क्षेत्रातील दिग्गजांचं घरी–येणं जाणं असायचं.

रविंद्रनाथ टागोर, जवाहरलाल नेहरूंपासून ते अगदी महात्मा गांधीजींपर्यंत. पुढे शिक्षण घेत असताना डॉ. विक्रम साराभाईंना टागोरांनी तर अगदी जवळून मदत केली, सूचना दिल्या, मार्गदर्शन केलं.

### दुसऱ्या महायुद्धामुळे तारांबळ

गणित, भौतिकशास्त्र, खगोलशास्त्र यांमध्ये विशेष आवड असणाऱ्या डॉ. विक्रम साराभाईंनी पुढील शिक्षणासाठी ब्रिटन गाठलं.

१९३७ साली ते ब्रिटनला गेले. प्रसिद्ध केंब्रिज विद्यापीठात. मात्र, त्याचवेळी दुसरं महायुद्ध ऐन भरात होतं. त्यामुळे तिथून ते पुन्हा मायदेशी परतले.भारतात आल्यानंतर डॉ. विक्रम साराभाई यांनी बंगळुरूतील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये संशोधनास सुरुवात केली. इथे त्यांना जे मार्गदर्शक लाभले, त्यातून डॉ. विक्रम साराभाई यांची आगामी वाटचाल कशी असेल, हे निश्चित झालं. कारण मार्गदर्शक होते नोबेल पुरस्कार विजेते सी. व्ही. रामन.

### भारतीय अवकाश संशोधन क्षेत्राची पायाभरणी

ब्रिटनमधून परतल्यानंतर डॉ. विक्रम साराभाई यांनी ११ नोव्हेंबर १९४७ रोजी फिझिकल रिसर्च लॅबची स्थापना केली. इथूनच त्यांनी खगोलशास्त्र, भौतिकशास्त्रातील संशोधनाची पायाभरणी करण्यास सुरुवात केली.

डॉ. विक्रम साराभाई यांचा विवाह सुप्रसिद्ध शास्त्रीय नृत्यांगना मृणालिनी स्वामिनाथन ह्यांच्यासोबत झाला होता. ह्या दोघांनी कलाचे प्रचार आणि शिक्षणासाठी १९४९मध्ये 'दर्पण अकादमी ऑफ परफॉर्मिंग आर्ट्स' ह्याची स्थापना केली. ह्यांनी भारताचे फार्मास्युटिकल उद्योगात देखील महत्वाचे योगदान दिले. हे फार्मास्युटिकल उद्योगात इलेक्ट्रॉनिक डेटा प्रोसेसिंग आणि ऑपरेशन्स रिसर्च तंत्र लागू करणारे पहिले व्यक्ती होते. ह्यांच्या सतत प्रयत्नांमुळे भारत औषध उद्योगात स्वावलंबी बनले. भारतीय प्रबंधक संस्थान,अहमदाबाद ह्याची स्थापना करण्यामध्ये देखील ह्यांनी सहकार्य दिल

अवकाश क्षेत्रात भारत आज उंच भरारी घेत असताना, ज्या संस्था हे यश मिळवत आहेत, त्यांची पायाभरणी करण्यास डॉ. विक्रम साराभाई यांनी १९५०च्या दशकातच सुरुवात केली होती.

२१ नोव्हेंबर १९६५ हा दिवस भारताच्या अवकाश संशोधनातील अत्यंत सुवर्ण दिवस ठरला. कारण याच दिवशी भारताने पहिलं रॉकेट लॉंच केलं. तेही डॉ. विक्रम साराभाई यांच्या अथक प्रयत्न आणि पुढाकारातूनच.

केरळमधील थुंबा येथे लॉंचपॅड निश्चित करण्यात आलं होतं. तिथेही अनेक लहान–मोठ्या अडथळ्यांना डॉ. साराभाईंना सामोरं जावं लागलं. मात्र या सगळ्यावर मात करत रॉकेटचं प्रक्षेपण करण्यात आलं. याचा परिणाम असा झाला की, संयुक्त राष्ट्राने पुढे या केंद्राला आंतरराष्ट्रीय केंद्र म्हणून मान्यता दिली.

पुढे भारताने या केंद्राला डॉ. विक्रम साराभाई यांचंच नाव दिलं. आज हे केंद्र 'डॉ. विक्रम साराभाई स्पेस सेंटर' म्हणून ओळखलं जातं. तिथे त्यांच्या पुतळ्याखाली त्यांचा एक विचार कोरण्यात आला आहे – आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून आपण माणूस आणि समाजाचे खरे प्रश्न सोडवण्याचे सर्वतोपरी प्रयत्न करायला हवेत.

ATIRA ची स्थापना करून भारतातील वस्त्रोद्योगाचा पाया डॉ. साराभाईंनी रचला एउखङ, णउखङ यांसारख्या संस्थांसह खखच्–अहमदाबादची स्थापना सुद्धा डॉ. विक्रम साराभाई यांनीच केली.

### 'इस्त्रो'ची स्थापना

अवकाश संशोधनासाठी भारत सरकारने १९६२ साली समिती नेमली. अर्थात, या समितीचं नेतृत्त्व डॉ. विक्रम साराभाई यांनीच केलं. डॉ. साराभाई यांच्या ज्ञानाचा आणि दूरदृष्टीचा इथेही फायदा झाला.

१९६९ साली याच समितीच्या शिफारशीतून 'भारतीय अवकाश संशोधन संस्था' अर्थात तुम्हा–आम्हाला अधिक ओळखीची असलेली 'इस्त्रो'ची स्थापना करण्यात आली.

इस्त्रोने पुढे अवकाश संशोधन क्षेत्रात भारताचं नाव अमेरिका, रशिया यांसारख्या प्रगत देशांच्या यादीत नेऊन ठेवलं.

### डॉ. विक्रम साराभाई मृत्यू संशयास्पद?

३१ डिसेंबर १९७१ ही भारतीय अवकाश संशोधन क्षेत्रासाठी 'काळरात्र' ठरली. डॉ. विक्रम साराभाई यांचं रात्री झोपेतच निधन झालं. १९६२मध्ये डॉ. विक्रम साराभाई ह्यांना शांती स्वरूप भटनागर मेडल देण्यात आला. १९६६मध्ये पद्मभूषण आणि १९७२मध्ये पद्मविभूषण दिले गेले

इस्त्रोचे माजी शास्त्रज्ञ नंबी नारायणन यांनी त्यांच्या 'ओरमाकलुडे ब्राह्मणापथम' या आत्मचरित्रातून डॉ. विक्रम साराभाई यांच्या निधनाबाबत शंका उपस्थित केली.

नंबी नारायणन म्हणतात, डॉ. विक्रम साराभाई यांचा मृत्यू संशयास्पद असतानाही पोस्टमार्टम का केलं गेलं नाही?

तिरुअनंतपुरम येथील थुंबा इक्वेटोरियल रॉकेट लॉन्चिंग स्टेशन आणि संबंधित अवकाश संस्थांचे नामकरण महान शास्त्रज्ञाच्या सन्मानार्थ विक्रम साराभाई स्पेस सेंटर असे करण्यात आले. हे भारतीय अंतराळ संशोधन संस्थाचे प्रमुख अंतराळ संशोधन केंद्र म्हणून उदयास आले आहे. १९७४ मध्ये सिडनीस्थित इंटरनॅशनल ॲस्ट्रॉनॉमिकल युनियनने ठरवले की 'सी ऑफ सेरेनिटी' वरील बेसाल्ट मून क्रेटर आता साराभाई विवर म्हणून ओळखले जाईल.१९७२ मध्ये त्यांच्या मृत्यूच्या पहिल्या स्मृतिदिनानिमित्त भारतीय टपाल विभागाने एक टपाल तिकीट जारी केले होते.

**(साभार : वेबदुनिया)**



## बदलते तंत्रज्ञान

# युट्युबवर काय बघायचं? 'हे' फीचर करेल तुमची मदत

युट्युब प्ले समथिंग बटण! (यूट्यूब) हे सर्वोत्कृष्ट व्हिडीओ स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मपैकी एक आहे. इथे एखादे गाणे ऐकणे, एखादा चित्रपट, मालिका, लहान मुलांसाठी आवडती गाणी, गोष्टी ऐकणे व पाहणे अगदी सहज सोपे जाते. पण, कधी कधी तुम्हाला योग्य व्हिडीओ किंवा तुम्हाला पाहिजे तसा व्हिडीओ शोधण्यासाठी संघर्ष करावा लागतो. तर, या स्क्रोलिंग समस्यांचा अंत करण्यासाठी, यूट्यूब नवीन 'प्ले समथिंग' फ्लोटिंग ॲक्शन बटणाची चाचणी करीत आहे.




९ ते ५ गुगलच्या अलीकडील अहवालानुसार नवीन ' प्ले समथिंग 'बटण काळ्या पार्श्वभूमीसह आणि तळाच्या पट्टीच्या अगदी वर पांढऱ्या मजकुरासह दिसते. या बटणावर टॅप केल्याने शॉर्ट्स प्लेअरमधील एखादा व्हिडीओ प्ले होईल. हे फीचर युजर्सना त्याच्या अनुभवावर आधारित नवीन व्हिडीओही दाखवेल.

उदाहरणार्थ– जर एखाद्या युजरला रोमॅंटिक गाणी पाहणे आवडत असेल, तर हे फीचर त्याला तसा कन्टेन्ट पोहोचवण्यात मदत करील. पण, असे दिसून आले की, प्लेअरच्या तळाशी असलेल्या टाइमलाइन स्क्रबरसह स्क्रीनच्या उजव्या बाजूला दिसणाऱ्या लाइक, डीसलाइक, कमेंट्स आणि शेअर बटणासह बटण पोर्ट्रेट मोडमध्ये नियमित कन्टेन्टसुद्धा प्ले करू शकते, पण जेव्हा मिनी प्लेअर ॲक्टिव्ह असतो तेव्हा 'प्ले समथिंग' बटण अदृश्य होते.

यूट्यूबने 'प्ले समथिंग फीचर'चा प्रयोग करण्याची ही पहिलीच वेळ नाही. २०२३ मध्ये एका युजर्सने काय पाहायचे ते ठरवू शकत नाही? असा मजकूर लिहिलेला बॅनर आणि तळाशी 'प्ले समथिंग बटण' दिसणारा एक फोटोसुद्धा शेअर केला होता.

नवीन 'प्ले समथिंग ' बटण सर्व युजर्ससाठी केव्हा आणले जाईल हे अद्याप अस्पष्ट आहे. पण, २०२४ वर्षाच्या सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे यूट्यूबमध्ये ते नवीन सुधारणा आणि फीचर्सचा एक समूह घेऊन येणार आहेत. त्यात प्लेलिस्टसाठी लघु प्रतिमा सेट करण्याची क्षमता, स्लीप टायमर सेट करणे, मिनी प्लेअर पुन्हा डिझाइन करणे आदी अनेक गोष्टी असणार आहेत. एकंदर नवीन फीचर तुम्हाला मदत करणार आहे.

# स्वरराज छोटा गंधर्व



## निमित्त

मराठी रंगभूमीवरील नामवंत गायक नट. 'सौदागर' ह्या नावानेही परिचित. संपूर्ण नाव सौदागर नागनाथ गोरे. जन्म सातारा जिल्ह्यातील कोरेगाव जवळच्या भाडळे या गावी. त्यांचे औपचारिक शिक्षण फारसे झाले नाही. मराठी रंगभूमीच्या इतिहासात बालनटांची नाट्यसंस्था म्हणून प्रसिद्ध असलेल्या 'बालमोहन संगीत मंडळी'चे मालक दामूअण्णा जोशी हे गोड गळ्याच्या मुलांच्या शोधात असताना त्यांना सौदागरांची माहिती मिळाली आणि त्यांच्या आईवडिलांची समजूत घालून त्यांनी सौदागर आणि त्यांचा धाकटा भाऊ पितांबर यांना आपल्या मंडळीत आणले. 'बालमोहन संगीत मंडळी'ने रंगभूमीवर आणलेल्या प्राणप्रतिष्ठा ह्या पहिल्याच नाटकात सौदागरांना त्यांची पहिली भूमिका वयाच्या १० व्या वर्षी मिळाली आणि तीही नायिकेची. सौदागरांच्या सुरेल आवाजाने आणि गाण्याच्या आकर्षक मांडणीने त्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली. त्यांच्या गंधर्वतुल्य आवाजामुळे दामूअण्णांनी आपल्या संस्थेतर्फे होणाऱ्या नाट्यप्रयोगांच्या जाहिरातींत सौदागरांचा उल्लेख 'छोटा गंधर्व' असा करण्यास सुरुवात केली आणि नंतर हेच नाव रूढ झाले. 'बालमोहन'च्या अन्य काही नाटकांत कामे केल्यानंतर, ह्या संस्थेने सादर केलेल्या संशयकल्लोळ ह्या नाटकातल्या नायिकेची–रेवतीची त्यांनी केलेली भूमिका अतिशय गाजली. त्यांनी गायलेल्या अनेक पदांना प्रेक्षकांकडून पसंती मिळत असे. संगीतकलेत सौदागरांची अधिकाधिक प्रगती व्हावी म्हणून दामूअण्णांनी सौदागरांना उत्तमोत्तम गायकांची तालीम मिळेल, अशी व्यवस्था केली. बळवंत गोवित्रीकर, दत्तुबुवा बागलकोटकर, नरहरबुवा पाटणकर, धुळे येथील गायनशिक्षक गणेशबुवा पाध्ये ह्यांनी त्यांना आरंभी गाणे शिकवले. सवाई गंधर्वांचीही थोडीशी तालीम मिळाली. कृष्णराव गोरे, अब्दुल करीमखॉं, मा. दीनानाथ ह्यांचाही काही सहवास आणि मार्गदर्शन त्यांना मिळाले. मात्र १९३९ साली ग्वाल्हेर घराण्याचे गायक सेंदेखॉं ह्यांचा गंडा बांधून सौदागर त्यांच्याकडे शिकू लागले. .अनेकांच्या गायकीचे अनुभव व संस्कार लाभल्यामुळे जेथे जे चांगले गवसेल, ते घेऊन आपल्या स्वत:च्या गायकीचे सुंदर रसायन त्यांना घडविता आले. सुरेल मुलायम आवाज, स्वच्छ दाणेदार ताना, सुंदर आणि स्पष्ट हरकती, मुरक्या, मिंड, सुरांचा प्रभावी लगाव, कमावलेला दमसास, मंद्रात खर्जापर्यंत जाणे ही त्यांच्या गायनाची प्रमुख वैशिष्ट्ये होत. त्यांच्या असामान्य गानकौशल्यामुळे 'स्वरराज छोटा गंधर्व' हे नामाभिधानही त्यांना लाभले. त्यांनी संजोग, गुणिकंस, नंदबसंत, कौशी बहार, बसंती, शंकरा यासारख्या नवीन रागांच्या संकल्पना केल्या. 'गुनरंग' या नावाने त्यांनी बंदिशी लिहिल्या. शृंगार, सृष्टीवर्णन, ईशस्तुती, अध्यात्म असे विविध विषय त्यांच्या चिजांत आढळतात. छोटा गंधर्व यांच्याबरोबर संशयकल्लोळमध्ये रेवतीची भूमिका करणाऱ्या इंदू तुळपुळे ह्यांच्याशी त्यांनी १९३७ साली विवाह केला. मुंबईत १९८० साली झालेल्या साठाव्या नाट्यसंमेलनाचे ते अध्यक्ष होते. संगीत नाटक अकादमीचा पुरस्कारही त्यांना देण्यात आला होता छोटा गंधर्व यांचे पुणे येथे निधन झाले. साभार **(इंटरनेट)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# हिवाळ्यामध्ये ऊन अंगावर घेताना कोणती काळजी घ्याल?

आतप म्हणजे ऊन. आयुर्वेदाने हिवाळ्यातल्या दिवसांमध्ये उन्हाचे सेवन करण्याचा सल्ला दिलेला आहे. हिवाळ्यामध्ये आतप सेवनाचा दिलेला सल्ला हा आरोग्यदायीच असतो, यामध्ये शंका नाही. हेमंत–शिशिरातल्या गारठ्याच्या दिवसांमध्ये अंगाला ऊब देणारे ऊन सर्वांनाच हवेहवेसे वाटते, ज्याचा शक्य होईल तितका आनंद प्रत्येकाने घ्यावा. त्यातही थंडी हा निसर्गतः शरीरामध्ये थंड, गोड, जड, स्निग्ध, बुळबुळीत गुणांचा कफ जमण्याचा (कफसंचयाचा) ऋतू असल्याने आणि ऊन त्या कफाच्या गुणांच्या विरोधी असल्याने या दिवसांमध्ये केलेले उन्हाचे सेवन कफ जमण्यास विरोध करणारे ठरते.



एकंदरच हिवाळ्यात उन्हाचे सेवन करणे आरोग्याला हितकर ठरते, त्यातही ज्यांच्या शरीरामध्ये मुळातच थंडावा अधिक असतो, अशा वात व कफ प्रकृतीच्या व्यक्तींनी एक तर थंडीमधून अचानक कडक उन्हात जाऊ नये. गारव्यामधून अचानक उष्म्यामध्ये जाणे आरोग्यासाठी हितकर नसते. हा शीत–उष्ण व्यत्यास शरीराची तापमान यंत्रणा बिघडवू शकतो. त्यामुळे गारठ्यामधून बाहेर पडल्यावर आधी सावलीमध्ये थोडा वेळ थांबून मग उन्हामध्ये जावे, शक्यतो शरीराला सुखद वाटेल असे ऊन अंगावर घ्यावे. गारठ्यामधून बाहेर पडल्यावर थेट सुर्याकडे पाहू नये.शिवाय, ऊन घेतल्यानंतर शरीराला वारा लागणार नाही, याची काळजी घ्यायला हवी. अंगावर ऊन घेतल्यामुळे शरीराला ऊब मिळते तेव्हा शरीराचे बाह्य तापमान गरम झालेले असते, अशा वेळेस त्वचेला गार वारे लागणे योग्य नाही. ते आरोग्यास हितकर होत नाही.

हिवाळ्यामध्ये सूर्यदर्शन नेहमीच होत नसल्याने सूर्यकिरणे शरीरावर न पडल्याने ड जीवनसत्त्वाची कमतरता ही गंभीर समस्या ठरते. ड जीवनसत्त्वाच्या अभावी हाडे कमजोर होतात, स्नायू सैल पडतात, रोगप्रतिकारशक्ती घटते, केस गळू लागतात, मानसिक त्रास सारखा होतो, मन अनुत्साही व निराश होते. या बहुतांश तक्रारी उन्हाचे म्हणजेच सूर्यकिरणांचे सेवन केल्यावर निघून जातात. सर्वसाधारणपणे सूर्यकिरणांमधील अल्ट्राव्हायोलेट (अतिनील)किरणांचा त्वचेशी होणारा संपर्क ड जीवनसत्त्वाच्या निर्मितीला चालना देत असल्याने; ज्या वेळी या किरणांचे प्रमाण सूर्यप्रकाशात सर्वाधिक असते, त्या वेळी म्हणजे सकाळी १० ते दुपारी २ या तासांमधील सूर्यकिरणे तुलनेने अधिक उपयुक्त ठरतात.

# सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी श्रीवर्धन तालुक्यात पर्यटकांची तुफान गर्दी

**श्रीवर्धन : बातमीदार**

नाताळची सुट्टी सुरू झाल्यापासूनच श्रीवर्धन तालुक्यात पर्यटकांचा ओघ मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. परंतु या वाढत्या पर्यटनामुळे प्रत्येक मार्गावरती होणारी वाहतूक कोंडी ही मोठी समस्या निर्माण झाली आहे. श्रीवर्धन समुद्र किनाऱ्यावर पार्किंगसाठी जागा अपुरी असल्यामुळे पर्यटक आपल्या गाड्या विविध पाखाड्यांमध्ये उभ्या करून ठेवत आहेत. दाबक पाखाडी, भैरवनाथ पाखाडी, चौकर पाखाडी, वेताळ पाखाडी या परिसरामध्ये नागरिकांच्या घरासमोरील प्रवेशद्वारासमोरच पर्यटक गाड्या उभा करून समुद्रकिनाऱ्यावर निघून जात आहेत. पोलिसांनी पार्किंगची तातडीची व्यवस्था म्हणून श्रीवर्धन येथील र.ना. राऊत विद्यालयाच्या मागील बाजूस असलेले पटांगण ज्या ठिकाणी चर खोदून बंद करण्यात आले होते ते तात्पुरत्या स्वरूपात चालू करून घेतल्यामुळे काही प्रमाणात वाहतूक कोंडी पासून श्रीवर्धन वासियांना दिलासा



मिळाला आहे.

श्रीवर्धन नगरपरिषदेकडून श्रीवर्धन शहराच्या प्रवेशद्वारावर पर्यटकांकडून पर्यटन कर घेतला जातो. परंतु या पर्यटन कराच्या मोबदल्यात येणाऱ्या पर्यटकांना पार्किंगची सुविधा उपलब्ध करून देणे हे नगरपरिषदेचे काम आहे. त्याचप्रमाणे श्रीवर्धन येथील मठाच्या स्मशानभूमी जवळ असलेले अवधूत मंदिर, त्या ठिकाणी उभ्या राहणाऱ्या बसेस व त्या ठिकाणी बनवण्यात येणारे जेवण यामुळे जागृत अवधूत मंदिर परिसर दिवसेंदिवस विद्रूप करून टाकण्यात येत आहे. वास्तविक पाहता नगरपरिषदेने त्या ठिकाणी सूचनाफलक लावून उघड्यावरती जेवण बनवण्यास सक्त मनाई आहे. अशा आशयाचे सूचनाफलक लावणे आवश्यक आहे.

अनेक वेळा पर्यटनासाठी येणारे पर्यटक आपल्याबरोबर जेवण बनवण्याचे सामान आणून कोणत्याही झाडाखाली, रस्त्याच्या कडेला जेवण बनविताना आढळून येतात. मात्र यामुळे परिसर अस्वच्छ होतो व या ठिकाणच्या धंद्यावरती त्याचे गंभीर परिणाम पाहायला मिळतात.

तरी श्रीवर्धन नगरपरिषद प्रशासनाने श्रीवर्धन शहरातील कोणत्याही भागांमध्ये उघड्यावरती अन्न शिजवणाऱ्यांवरती कारवाई करावी. अशी मागणी स्थानिक व्यावसायिकांमधून करण्यात येत आहे. श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरील धूप प्रतिबंधक बंधारा दांडा विभागाच्या ज्या दिशेला संपतो. त्या ठिकाणी हेलिपॅड बांधण्यात आलेले आहे व शासकीय विश्रामगृहाच्या बाजूने असलेल्या जागेतून हेलिपॅड पर्यंत जर का पार्किंगची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली तर पर्यटकांच्या शेकडो गाड्या त्या ठिकाणी सुरक्षितपणे उभ्या करता येतील.

यापासून नगरपरिषदेला देखील उत्पन्न मिळेल. परंतु केवळ लोकप्रतिनिधी व प्रशासन यांच्या नियोजनाच्या अभावामुळेच पर्यटकांना देखील गैरसोय होत आहे व स्थानिक नागरिकांना देखील असुविधांना सामोरे जावे लागत आहे. येणाऱ्या बेशिस्त पर्यटकांकडून श्रीवर्धन येथील समुद्रकिनाऱ्यावर वाळू वरती गाड्या नेण्याचे प्रकार देखील सातत्याने समोर येत आहेत. तरी नगर परिषदेने नेमलेल्या जीव रक्षकांनी अशा गोष्टींकडे गांभीर्याने पाहून सदर गाड्या वाळूवर न देण्याबाबत पर्यटकांना सूचना करण्याची आवश्यकता आहे.

बेशिस्तपणे वाहने उभी करून समुद्रकिनाऱ्यावर निघून जाणाऱ्या पर्यटकांवर देखील कारवाई करणे गरजेचे आहे. एकूणच वाढत्या पर्यटना बरोबरच प्रशासनाची नियोजन शून्यता देखील समोर येत आहे.

या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांकडून अनेक वेळा मुजोर पणा केला जातो. आम्ही येथे फिरण्यासाठी येतो, म्हणून तुमचे धंदे चालतात. अशा प्रकारे स्थानिकांना सुनावले जाते.समुद्र किनाऱ्यावर व परिसरात मद्यपान करण्याचे प्रकार सुध्दा वाढले आहेत.

# हुतात्मा स्तंभाचे सिद्धगड बलिदान दिनी होणार लोकार्पण

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील पत्रकारांनी स्थापन केलेल्या हुतात्मा स्मारक समिती या समाजसेवी संघटनेच्या वतीने हुतात्मा भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांचा बलिदान दिन दरवर्षी साजरा केला जातो. मुंबई येथे असलेल्या हुतात्मा चौक येथे असलेले संयुक्त महाराष्ट्र लढ्याच्या शिल्पचि हुबेहूब प्रतिकृती नर्रल येथील हुतात्मा चौकात उभारली आहे. या नवीन हुतात्मा स्मारकाचे लोकार्पण हुतात्मा बलिदान दिनी होणार आहे.

यावर्षी सिद्धगड बलिदान दिनी वांगणी, बदलापूर येथील मुक्या प्राण्याचे अनाथाश्रम चविणारा पाणवठा संस्था तसेच हुतात्मा आणि क्रांतिकारण यांच्या जीवनावर अभ्यासपूर्ण लेखन करणारे मुरबाड येथील लेखक गिरीश कंटे यांना हुतात्मा गौरव पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे.

नेरळ येथे २००५ मध्ये कर्जत तालुक्यातील पत्रकारांनी हुतात्मा सामरिक समितीची स्थापना केली होती. कर्जत तालुक्यातील हुतात्मा भाई कोतवाल आणि हुतात्मा हिराजी पाटील तसेच १९४२ मध्ये ब्रिटिश सरकारला देशातून चले जावं करण्यासाठी पुकारलेल्या लढ्यात कर्जत तालुक्यातील स्वातंत्र्यसैनिक सहभागी झाले होते. त्या सर्वांच्या प्रचार आणि प्रसाराचे कार्य हुतात्मा सामरिक समिती करीत आली आहे.

या समितीच्या वतीने हुतात्मा भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांचा बलिदान दिनानिमित्त दरवर्षी दोन जानेवारी रोजी सिद्धगड बलिदान दिवस साजरा केला जातो.

त्या कार्यक्रमात समाजातील देशहिताचे कार्य करणाऱ्या व्यक्ती,संस्था यांचा सन्मान केला जातो.यावर्षी वांगणी बदलापूर मध्ये मुक्या प्राण्यांवर उपचार करून त्यांच्यासाठी प्राण्यांचे अनाथाश्रम गेली २० वर्षे चालवणारे पाणवठा संस्था आणि त्यांचे प्रमुख गजराज जैन यांना हुतात्मा गौरव पूयरस्कार देऊन संमनाईट केले जाणार आहे.

तर आझाद दस्त्यातील क्रांतिकारक आणि हुतात्मांचा इतिहास पुस्तक रूपाने आणणारे लेखक मुरबाड तालुक्यातील गिरीश कंटे यांना सिद्धगड बलिदान दिन सभेचे अध्यक्ष आणि कर्जत विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते हुतात्मा गौरव पुरस्कार देऊन सन्मानित केले जाणार आहे.

उभारलेल्या हुतात्मा शिल्पाचे लोकार्पण खासदार सुनील तटकरे यांचे हस्ते लोकार्पण केले जाणार आहे. या सिद्धगड बलिदान दिन अभिवादन सभेला कर्जत खालापूरचे माजी आमदार सुरेश लाड, रायगड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष सुरेश टोकरे, रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे यांच्यासह तहसीलदार डॉ. धनंजय जाधव, तालुक्याचे पोलीस उप अधीक्षक राहुल गायकवाड, कर्जत नगरपरिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा पुष्पा दगडे, माथेरानच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी, नेरळ ग्रामपंचायतीचे प्रशासक सुजित धनगर आणि नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी राहुल वरोटे उपस्थित राहणार आहेत.

## जिंदल रुग्णालयामार्फत तामसोलीत हृदय तपासणी शिबिर

**नागोठणे : बातमीदार**

रोहा तालुक्यातील नागोठणे जवळील जिंदल कंपनीच्या समुहाअंतर्गत असलेल्या बी.सी. जिंदल रुग्णालयाच्या सौजन्याने तसेच ऐनघर ग्रामपंचायतीचे सदस्य प्रकाश डोबळे यांच्या सहकार्याने सोमवार (दि.२९) रोजी ऐनघर ग्रामपंचायत हद्दीमधिल तामसोली गावामध्ये हृदय तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये एकुण ७६ नागरीकांनी लाभ घेत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या शिबिरामध्ये जिंदल रुग्णालयातील डॉ. मनिष रायकवार यांच्यातर्फे नागरीकांची मोफत तपासणी करण्यात आली.

या शिबिरामध्ये नागरीकांची ईसीजी, रक्तदाब तपासणी,



रक्तातील साखरेचे प्रमाण तपासून मोफत औषधे देण्यात आली. या शिबिरामध्ये जिंदल रुग्णालयातील डॉ. मनिष रायकवार, ऐनघर ग्रामपंचायत सदस्य प्रकाश डोबळे, जिंदल रुग्णालयाचे व्यवस्थापक सर्वेश पांचोली, कमलेश अस्थांना, सुधाकर शिरसे, तुकाराम शिरसे, बबन डोबळे, लक्ष्मण चव्हाण, तुकाराम यादव निहाल जाधव, प्रविण चव्हाण , जिंदल रुग्णालयातील कर्मचारी दिनेश ठमके, मोहीनी जांबेकर , आदी ग्रामस्थ उपस्थित होते

## जन्मबंध व्हॉट्सअॅप ग्रुपची प्रेरणादायी, ऐतिहासिक वाटचाल

**अलिबाग : प्रतिनिधी**

जन्मबंध फाउंडेशनच्या पुढाकारातून सुरू झालेल्या जन्मबंध व्हॉट्सअॅप ग्रुप या उपक्रमाने सुवर्णकार समाजासाठी एक आदर्श निर्माण केला आहे. केवळ व्हॉट्सअॅप या डिजिटल माध्यमाच्या सहाय्याने समाजातील विविध शाखांमधील ७,०००हून अधिक मुला-मुलींची विवाह जुळवणी पूर्णतः विनामूल्य करण्यात आली असून यासाठी कोणाकडूनही कोणताही मोबदला स्वीकारण्यात आला नाही.

सन २०१२मध्ये मुंबई येथे झालेल्या वर-वधू परिचय मेळाव्यानंतर समाजोपयोगी, दीर्घकालीन उपक्रमाची संकल्पना आकाराला आली. त्यानंतर सन २०१३मध्ये जन्मबंध व्हॉट्सअॅप ग्रुपची औपचारिक स्थापना करण्यात आली. सुरुवातीला शंका व्यक्त झाल्या तरी समाजातील मान्यवरांच्या सहकार्यामुळे उपक्रम यशस्वी ठरला.

आजच्या धकाधकीच्या जीवनात लग्न जुळवणीसाठी लागणारा आर्थिक व मानसिक ताण कमी करण्यासाठी जन्मबंधने डिजिटल माध्यमाचा सकारात्मक वापर केला. घरबसल्या, पारदर्शक व सुलभ पद्धतीने अपेक्षित वर-वधूंची माहिती उपलब्ध करून देण्याचे कार्य प्रभावीपणे सुरू आहे. आजवर मुंबई, पुणे, नाशिक, धुळे, सटाणा, बदलापूर, उज्जैन, छत्रपती संभाजीनगर, बडोदा, इंदूर आदी ठिकाणी १८ विनामूल्य वर-वधू परिचय मेळावे यशस्वीरीत्या पार पडले असून त्यामुळे समाजाचा कोट्यवधी रुपयांचा खर्च वाचला आहे. विधूर, विधवा व अपंग व्यक्तींनाही योग्य जोडीदार मिळवून देण्यात जन्मबंधने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

जन्मबंध फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रभाकर मोरे यांच्या नेतृत्वाखाली अनेक निःस्वार्थ समाजबांधवांच्या सहकार्यामुळे हा उपक्रम वटवृक्षात रूपांतरित झाला आहे. दिवंगत सहकाऱ्यांच्या योगदानाबद्दल या वेळी कृतज्ञतापूर्वक स्मरण करण्यात आले.

## खालापूर येथे दुकानात चोरी

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गालगत दुकानाच्या दुरुस्तीचे सुरू असलेल्या कामाचा चोरट्यांनी फायदा घेत दुकानातील एकूण ८१हजार१०० रुपये किमंतीचा माल चोरून नेल्याची घटना खालापूर येथे घडली आहे. कोजाराम प्रजापती यांच्या

हार्डवेअर दुकानाचे दुरूस्तीचे काम चालु असल्याने दुकानाचा मागील पत्रा त्यांनी काढुन ठेवला होता.रविवारी रात्री त्या ठिकाणावरून चोरटयाने आतमध्ये प्रवेश करून कोअर केबल स्वतः चे फायदा करीता चोरी करून पळवुन घेवुन गेला. याबाबत खालापूर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे

## प्रा. जीवन आरेकर यांना पीएचडी प्रदान

**रोहा : प्रतिनिधी**

महाराणा प्रताप कृषी व तंत्रज्ञान विद्यापीठ उदयपूर अंतर्गत राजस्थान कृषी महाविद्यालय उदयपूर यांच्या एकोणिसाव्या पदवीदान समारंभात दिनांक २२ डिसेंबर २०२५ रोजी राजस्थान चे महामहिम राज्यपाल श्री हरिभाऊ बागडे यांच्या शुभहस्ते प्राध्यापक जीवन आरेकर यांना पीएचडी कृषी (वनस्पती रोगशास्त्र) विषयात पदवी प्रदान करण्यात आले.या कार्यक्रमाला राजस्थानचे कृषिमंत्री डॉ. किरोदीलाल मीना, निर्देशक डॉ. अरविंद वर्मा उपस्थित होते.

जीवन आरेकर यांनी डॉ.अमित त्रिवेदी प्राध्यापक (वनस्पती रोगशास्त्र) यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली आणि डॉ.प्रमोद बोरकर सहयोगी प्राध्यापक यांच्या सह मार्गदर्शना खाली त्यांनी कोकणातील मिरची वरील करपा रोगाला कारणीभूत असणाऱ्या बूरशी ची जैवविविधता आणि व्यवस्थापन या विषयावर संशोधन कार्य पूर्ण केले त्यांनी आपल्या सदर संशोधनाचा प्रबंध मार्च २०२५ रोजी सादर केला. परंतू औपचारिक स्वरूपात डिसेंबर महिन्यात १९ व्या पदवी दान समारंभात सदर पदवी प्रदान करण्यात आली.प्रा जीवन आरेकर हे कृषि विज्ञान केंद किल्ला रोहा रायगड येथे गेली १८ वर्षे शास्त्रज्ञ म्हणून कार्यरत आहेत.

डॉ जीवन आरेकर यांनी पीएच डी पदवी प्राप्त झाल्या वर डॉ बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली चे सन्मानिय कुलगुरू महोदय डॉ संजय भावे सर व मा.विस्तार संचालक डॉ मकरंद जोशी सर तसेच कृषि विज्ञान केंद्र किल्ला रोहा रायगड येथील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे यांचे आभार मानले




## डॉ.सी.डी. देशमुख महाविद्यालयाचे श्रमसंस्कार शिबिर

**रोहे : प्रतिनिधी**

कोकण एज्युकेशन सोसायटीच्या डॉ.चिंतामणराव देशमुख वाणिज्य व सौ. कुसुमताई ताम्हणे कला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे सात दिवसीय निवासी विशेष श्रमसंस्कार शिबिर नुकताच भागीरथीखार येथे संपन्न झाले. हे निवासी विशेष श्रमसंस्कार शिबिर युथ फॉर माय भारत, डिजिटल लिटरसी व युथ फॉर सस्टनेबल डेव्हलपमेंट या संकल्पनांवर आयोजित करण्यात आले होते.

या शिबिराचे उद्घाटन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते धर्माजी कोळी यांच्या शुहस्ते झाले. उद्घाटन प्रसंगी या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अतुल साळुंके, राष्ट्रीय सेवा योजना रायगड जिल्हा



समन्वयक प्रा. तुळशिदास मोकल, प्रा.शत्रुघ्न लोहकरे, प्रा.सीमा भोसले, डॉ.कमलाकर कांबळे, प्रा .कृष्णा जांभेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

या शिबिरात सहभागी विद्यार्थांनी ग्राम स्वच्छता, स्मशानभूमी परिसर स्वच्छता, मंदिर परिसर स्वच्छता, पाणवठा स्वच्छता, शाळा परिसर स्वच्छता आदी स्वच्छतेची कामे केली. त्याच बरोबर वृक्षारोपण व बंधारे निर्मिती करून भरीव स्वरूपाच्या कामाना हातभार लावला.या शिबिराच्या बौध्दिक सत्रात राष्ट्रीय सेवा योजनेतील युवकांची भूमिका, सायबर क्राईम स्वरूप, परिणाम व उपाय, शाश्वत विकासातील युवकांचे योगदान, एड्स प्रतिबंध कार्यातील व्यक्ती, संस्था व शासनाची भूमिका, समाज प्रबोधनातील प्रसारमाध्यमांची भूमिका, जलसंवर्धन एक काळाची गरज, डिजिटल साक्षरता, अंधश्रधा निर्मूलन कार्यातील शास्त्रीय दृष्टिकोनाचे महत्व आदी विषयांवर मान्यवरांची प्रबोधनपर व्याख्याने झाली.

या शिबिरात नेत्रचिकितसा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या नेत्रचिकितसा शिबिरात १६० लोकांच्या डोळयांची तपासणी करण्यात आली.

या शिबिराच्या मनोरंजनाच्या सत्रात सहभागी विद्यार्थांनी स्त्रीभूण हत्या, जल साक्षरता, स्वच्छता अभियान, एड्स प्रतिबंध जनजागृती, मतदान जनजागृती व अंधश्रधा निर्मूलन या विषयांवर पथनाट्य सादर केली.

या शिबिराचा समारोप युवा उद्योजक अमीत आठवले, ज्ञानेश्वर कोळी यांच्या प्रमुख उपस्थित व या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अतुल साळुंके यांच्या अध्यक्षतेखाली झाला.

## आकाशात विलीन झालेली 'शौर्य' रांगोळी ठरली लक्षवेधी

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

श्री शिवदत्त मंदिर चौल,आंबेपूर येथे संपन्न झालेल्या रांगोळी प्रदर्शनामध्ये मुरुड तालुक्यातील नांदगाव सारख्या ग्रामीण भागातून आलेला रांगोळीकार क्षितिज निशिकांत मळेकर याने दुबई एअर शो दरम्यान तेजस अपघातात मृत्युमुखी पडलेले



भारतीय वायू सेनेचे शूर वैमानिक विंग कमांडर नामांश स्याल यांना अर्पण केलेली हृदयस्पर्शी श्रद्धांजली वाहण्यासाठी साकारलेली रांगोळी सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. आकाशात झेप घेणाऱ्या त्यांच्या स्वप्नांचा आणि देशासाठी दिलेल्या सर्वोच्च बलिदानाचा साक्षीदार म्हणजे ही रांगोळी तसेच खाली प्रज्वलीत दिवा त्यांच्या अमर स्मृतीचा, शौर्याचा आणि राष्ट्रभक्तीच्या अखंड तेजाचं प्रतीक असल्याचे रांगोळीकार क्षितिज ने सांगितले, काही दिवसांपूर्वी रेवदंडा येथील कालभैरव मंदिरामध्ये कालभैरव जयंती निमित्त क्षितिज ने साकारलेल्या एका स्त्रीच्या पाण्यातील प्रतिबिंबाची रांगोळी पाहून दर्शक अवाक झाले होते, या त्याच्या कौतुकात्मक कामगिरीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.


### मूळ कागदपत्रे गहाळ झाल्याची सूचना

आम्ही, श्री. प्रकाश रघुनाथ तायडे व श्रीमती. सुनंदा प्रकाश तायडे, राहणार रो हाउस/प्लॉट क्र. एफ-५७, सेक्टर १२, खारघर, नवी मुंबई ४१०२१०. आमच्या कडून मूळ कुलमुखत्यारपत्र जे श्री. निसार सय्यद व श्रीमती. सुलताना निसार सय्यद यांच्या मधे बनला होता, रेजी. क्र. टनन-८/**१२३१७/२०१९ दि. ०५/०९/२०१९** हरवले/गहाळ झाले आहे.

त्याबाबत मी खारघर पोलीस ठाणे येथे मिसिंग कंप्लेंट नोंद केली आहे, त्याचे गहाळ तक्रार क्र. **१९६३/२०२५** आहे. त्याप्रकारचा मिसिंग कंप्लेंटचा दाखला घेतला आहे.

याद्वारे स्पष्ट केले जाते की श्री. प्रकाश रघुनाथ तायडे आणि श्रीमती सुनंदा प्रकाश तायडे हे वरील मालमत्तेचे सध्याचे मालक आहेत, त्यांनी कायदेशीररित्या त्या मालमत्तेवर हक्क, मालकी हक्क आणि हितसंबंध मिळवले आहेत. सदर हरवलेला पॉवर ऑफ ॲटर्नी कोणत्याही व्यक्ती, बँक, वित्तीय संस्था किंवा प्राधिकरणाकडे गहाण, तारण ठेवलेला नाही. वरील मालमत्तेच्या हरवलेल्या पॉवर ऑफ ॲटर्नीबाबत कोणत्याही व्यक्ती, बँक, वित्तीय संस्था किंवा कोणत्याही प्रकारचा आक्षेप नाही.

सदर कागदपत्र सापडल्याचा दावा करणाऱ्या किंवा त्याबाबत कोणताही दावा, हक्क किंवा आक्षेप असलेल्या कोणत्याही व्यक्तीने या सूचना प्रकाशित झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खाली नमूद केलेल्या पत्त्यावर खालील स्वाक्षरीदाराशी संपर्क साधावा. जर विहित कालावधीत कोणताही दावा किंवा आक्षेप प्राप्त झाला नाही, तर असा कोणताही दावा अस्तित्वात नाही असे गृहीत धरले जाईल आणि माझ्या अशिलाला पॉवर ऑफ ॲटर्नीची प्रमाणित प्रत मिळविण्यासाठी अर्ज करण्यास आणि आवश्यकतेनुसार पुढील पावले उचलण्यास स्वातंत्र्य असेल.

**दिनांक : ३१/१२/२०२५** **सही/-**
**ठिकाण : खारघर** **ॲड. आदित्य कटकदौंड**

AD - Kharghracha Raja Ganesh Mandir (Basement), Opp. Gokhale School, Sector 12, Kharghar, Navi Mumbal-410 210, e-mail-adv.k.aditya23@gmail.com, Mob: 9594962207


# नेरळ हिंदू स्मशानभूमी नूतनीकरणाचे लोकार्पण

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत-कल्याण राज्यमहामार्गालगत नेरळ ग्रामपंचायत हद्दीत गणेश घाट परिसरात हिंदू स्मशानभूमीच्या नुतनीकरणाच्या कामाचा लोकार्पण सोहळा मंगळवारी (दि. ३०) शिवसेना शिंदे गटाचे उत्तर रायगड उपजिल्हाप्रमुख भाई गायकर व युवासेना शिंदे जिल्हाप्रमुख प्रसाद थोरवे यांच्या हस्ते पार पडला. यानिमित्ताने नेरळमधील नागरिकांसाठी अंत्यविधीची आवश्यक व सुसज्ज



सुविधा पुन्हा एकदा खुली करण्यात आली आहे.

नेरळ ग्रामपंचायतीच्या हिंदू स्मशानभूमीची अवस्था मागील काही वर्षांपासून अत्यंत दयनीय झाली होती. लाकडे ठेवण्याच्या खोल्या जीर्ण झाल्या होत्या तसेच अंत्यविधीच्या वेळी नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत होता. ही बाब लक्षात घेऊन आमदार महेंद्र थोरवे यांच्या प्रयत्नातून ७० लाख रुपयांचा निधी मंजूर करून स्मशानभूमीच्या नुतनीकरणाचे काम हाती घेण्यात आले होते. नूतनीकरणाच्या कालावधीत नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून बाजूच्या पर्यायी जागेवर अंत्यविधीची तात्पुरती व्यवस्था करण्यात आली होती, मात्र नेरळच्या वाढत्या लोकसंख्येमुळे ही व्यवस्था अपुरी ठरत होती. अखेर नुतनीकरणाचे काम पूर्ण झाल्याने नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

या वेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना प्रसाद थोरवे यांनी भविष्यात नेरळमध्ये अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक स्मशानभूमी उभारली जाईल, असे आश्वासन दिले.या कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष सुरेश टोकरे, शिवसेना नेते शिवराम बदे, यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

# परराज्यातून आरोपींच्या मुसक्या आवळल्या

## रसायनी पोलिसांकडून धार गँगचा पर्दाफाश

**मोहोपाडा, चौक : प्रतिनिधी**

रिसगाव व एमआयडीसी कॉलनी, मोहोपाडा परिसरात सलग झालेल्या घरफोडी चोरीच्या घटनांनी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. अखेर रसायनी पोलिसांनी परराज्यातील कुख्यात 'धार गँग'चा पर्दाफाश करत मोठे यश मिळवले आहे, अशी माहिती रायगड जिल्हा पोलीस अधिक्षक आँचल दलाल यांनी रसायनी पोलीस ठाण्यात सोमवारी (दि.२९) आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

या वेळी रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर, पोलीस उपनिरीक्षक मंगेश वाचकर व रसायनी पोलिसांचे कौतुक केले.





मध्यप्रदेशसह अनेक राज्यांत सक्रिय असलेल्या या टोळीतील आरोपींना जेरबंद करत पोलिसांनी सुमारे तीन लाख रुपयांचे सोने-रोख दागिने आणि चोरीस गेलेली मोटरसायकल हस्तगत केली आहे.

या प्रकरणात रसायनी पोलीस ठाण्यात दाखल चार घरफोडीच्या गुन्ह्यांची उकल झाली असून, आरोपी दरवाजाचे कडी-कोयंडे तोडून फ्लॅटमध्ये घुसखोरी करत सोनं व रोख रक्कम लंपास करत होते. घटनास्थळांवरील सीसीटीव्ही फुटेज पोलिसांसाठी निर्णायक ठरले. फुटेजच्या आधारे तपास थेट मध्यप्रदेशातील धार जिल्ह्यापर्यंत पोहोचला. पोलीस उपनिरीक्षक मंगेश बाचकर यांच्या पथकाने बगोली (ता. कुक्षी, जि. धार) येथे धाड टाकून प्रकाश आलवा याला अटक केली. चौकशीत त्याच्याकडून घरफोडीतील सोन्याचे दागिने, रोख रक्कम व चोरीची दुचाकी जप्त करण्यात आली. तसेच या टोळीतील दुसरा मुख्य आरोपी सुरेश शेंगर हा कर्नाटक कारागृहात अटकेत असल्याचे उघड झाल्यानंतर त्यालाही ताब्यात घेण्यात आले आहे.

ही कारवाई रायगड पोलीस अधीक्षक आँचल दलाल, अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे व उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल नेहुल यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदारांच्या धडाकेबाज कामगिरीचे नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात कौतुक होत आहे.

यात पोलीस उपनिरीक्षक प्रकाश माळी, पोलीस एएसआय कोलेकर, रणजित खराडे, अनंता थोरात, सुशांत पिंगळे, संतोष म्हात्रे, गिरीश नगरकर, होळे, रुषी पवार आदींनी कारवाई केली.दरम्यान, घरफोडी व चोरीसारख्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी नागरिकांनी सोसायट्या व इमारतींमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, तसेच संशयित हालचाली आढळल्यास तात्काळ डायल ११२ किंवा जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय बांगर यांनी केले आहे.

# अल्पवयीन मुलीला प्रेमाच्या जाळ्यात ओढून अत्याचार

## आरोपीला पनवेल पोलिसांनी केली अटक

**पनवेल : वार्ताहर**

खारघर परिसरातून १७ वर्षीय अल्पवयीन मुलीला प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिला पळवून नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार करणाऱ्यास खारघर पोलिसांनी अटक केली आहे.

अजयकुमार जनझोरड (वय २९) असे त्याचे नाव असून, पोलिसांनी त्याच्या ताब्यातून पीडित मुलीची सुटका करून तिच्या कुटुंबीयांच्या ताब्यात दिले. अजयकुमार हा खारघरमधील पेठ गावात राहण्यास होता. गेल्या काही महिन्यांपूर्वी आरोपी अजयकुमार याने पीडित मुलीसोबत प्रेमसंबंध निर्माण केले होते. त्यानंतर त्याने संधी साधून पीडित मुलीला पळवून नेत तीला कळंबोली लेबर कॅम्पमधील रूमवर नेऊन ठेवले होते. पीडित मुलीने तिची आई काम करत असलेल्या मॅडमच्या घरी जाते असे लहान बहिणीला सांगून घरातून निघून गेली होती, मात्र सायंकाळपर्यंत घरी परतली नव्हती. त्यामुळे तिच्या घरच्यांनी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. तक्रारीनुसार खारघर पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली होती.

या तपासादरम्यान पोलिसांनीपरिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली असता, पीडित मुलगी एका तरुणासोबत दुचाकीवरून गेल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर खारघर पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजमध्ये दुचाकीचा नंबर मिळवून त्याच्या मालकाचा शोध घेतला असता, ही दुचाकी अजयकुमार याची असल्याचे समोर आले. त्यानंतर पोलिसांनी त्याचा शोध घेऊन खारघरमधील पेठ गावातून ताब्यात घेतले.

# फुंडे येथे थॅलेसेमिया जनजागृती आणि तपासणी शिबिरास प्रतिसाद




**उरण : वार्ताहर**

तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय, फुंडे येथे झड- इंडिया यांच्या माध्यमातून अर्पण रक्तपेढी व अर्पण थॅलेसेमिया सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने थॅलेसेमिया जनजागृती व तपासणी शिबिराचे दोन दिवसीय आयोजन करण्यात आले. डॉ.रचना पवार यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली.

या वेळी दक्षता आग्रे, संचिता जाधव, इरम शेख, नेहा शर्मा व विकेश वानखेडे यांच्या तज्ज्ञ टीमने विद्यार्थ्यांची थॅलेसेमिया आजारासंदर्भात तपासणी केली. विद्यार्थ्यांचे रक्तनमुने घेऊन ते मुलुंड, मुंबई येथील अर्पण रक्तपेढी येथे सखोल तपासणीसाठी पाठविण्यात येतात. त्या तपासणीच्या आधारे आजाराचे अचूक निदान करण्यात येते.

शिबिर विद्यालयाचे प्राचार्य बबन साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडले. या शिबिराचे यशस्वी नियोजन विद्यालयाच्या उपमुख्याध्यापिका संगीता थोरात, दि. रयत सेवक को-ऑप. बँकेचे संचालक प्रा. किशोर पाटील, ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख प्रा. बाबूलाल पाटोळे, सायन्स विभागप्रमुख प्रा. झुंझार माने, कॉमर्स विभागप्रमुख प्रा. ऋषिकेश धुरी, आरोग्य समिती प्रमुख प्रा. केशव पवार, प्रा.अरुण देवरे कार्यालयीन प्रमुख नितीन म्हात्रे, नवनीत ठाकूर, प्रतिक वर्तक तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्याने करण्यात आले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये थॅलेसेमिया आजाराबाबत जनजागृती वाढण्यास मदत झाली असून, वेळेवर तपासणी व निदानाचे महत्त्व अधोरेखित झाले. या वेळी बहुसंख्य विद्यार्थ्यांनी शिबिराचा लाभ घेतला.

# महावितरणच्या ऑनलाईन सेवेमुळे ग्राहकांना सुविधा

**मुंबई : प्रतिनिधी**

वीज कनेक्शनच्या नावात बदलाच्या अर्जांना स्वयंचलित मंजुरी देण्याची सुविधा महावितरणने सुरू केल्यानंतर राज्यातील वीज ग्राहकांना त्याचा मोठा लाभ झाला असून दोन महिन्यात ५८,१६७ ग्राहकांनी घरबसल्या नावात बदल (चेंज ऑफ नेम) करून घेतला. त्याचसोबत वीज ग्राहकांना मंजूर भार वाढवून घेण्यासाठी सुरू केलेल्या सुविधेचा १०,४२८ ग्राहकांनी लाभ झाला आहे.

जीवनसुलभतेसाठी (ईज ऑफ लिव्हिंग) महावितरणने वीज ग्राहकांना जास्तीत जास्त सेवा ऑनलाईन द्याव्यात जेणेकरून वीज ग्राहकांना घरबसल्या सुविधांचा लाभ घेता येईल व त्यांना कार्यालयात जावे लागणार नाही, असा प्रयत्न चालू आहे. त्यानुसार महावितरणने वीज कनेक्शन नावात बदल आणि मंजूर भार बदल यासाठी ऑनलाईन व झटपट सुविधा उपलब्ध केली आहे.

खरेदी - विक्री, वारसा हक्क किंवा इतर कारणांमुळे घर किंवा इतर मालमत्तेच्या मालकीमध्ये बदल झाल्यानंतर वीजबिलाच्या ग्राहक नावात बदल करण्यासाठी अर्ज करण्यात येतो. या प्रक्रियेसाठी महावितरण मोबाईल ॲप अथवा ु. ारहरवळीलो.ळप या संकेतस्थळावर वीजग्राहकांना 'लॉग-इन'द्वारे ऑनलाइन अर्ज सादर करता येतो. ग्राहकाला कोणत्या कारणासाठी नाव बदलणे आवश्यक आहे त्याचा पर्याय निवडला की, त्यानुसार आवश्यक ते निवडक दाखले जोडावे लागतात. त्यानंतर ऑनलाईन पद्धतीने प्रक्रिया शुल्क भरल्यानंतर तीन ते सात दिवसात नावातील बदलाची प्रक्रिया पूर्ण होते.

# सुभाष राठोड यांची राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेसाठी निवड

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा परिसरातील रायगड जिल्हा परिषद ग्रामीण उत्कृष्ट उच्च प्राथमिक शाळा वडगावचे शिक्षक सुभाष रामचंद्र राठोड यांची सध्या सुरू असलेल्या महाराष्ट्र राज्य शालेय शिक्षण विभागा तर्फे महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे आयोजित विविध स्पर्धा सुरू आहेत. त्यातील वादविवाद स्पर्धेत वडगाव शाळेचे उपक्रमशील व अभ्यासू शिक्षक सुभाष राठोड यांची केंद्र, तालुका व विभागात उत्कृष्ट सादरीकरणाच्या जोरावर रायगड, ठाणे, मुंबई, नवी मुंबई, पालघर या जिल्ह्यातून मुंबई विभागातून राज्यस्तरावर निवड झाली आहे. त्यामुळे त्यांचे जिल्हाभर कौतुक होत असुन शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



सुभाष राठोड सरांबरोबरच मुंबई महापालिका चे किसन मोरे, पालघरच्या वाकपट्टू प्रतिभा कदम,नवी मुंबई च्या आरती औचर व रायगड माणगावच्या अपूर्वा जंगम यांची सुद्धा राज्य स्तरासाठी निवड करण्यात आलेली आहे. सुभाष राठोड सरांचे विशेष कौतुक यासाठी होत आहे की त्यांचा अलीकडेच जीवघेणा अपघात झालेला असून सुद्धा राठोड सरांनी चार स्पर्धेत भाग घेत चारही ठिकाणी अव्वल बक्षीस जिंकलेली आहेत. त्यांनी अपघातात पाय गमावून सुद्धा तसूभर आत्मविश्वास कमी न होऊ देता जिद्दीने भरारी घेत आहेत. सरांच्या जिद्दीला व आत्मविश्वासला सर्व स्तरातून कौतुकाने सलाम केला जात आहे.

सुभाष राठोड हे हरहुन्नरी, अभ्यासू व जिद्दी आहेतच सोबत शब्दाचे पक्के आहेत. नक्कीच ते राज्यस्तरीय स्पर्धेत उत्तम कामगिरी करतील यात शंका नाही. त्यांच्या सोबतच इतरही वेगवेगळ्या स्पर्धेत शिक्षक पात्र आहेत त्यांना दिपा परब, गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती खालापूर तसेच सुभाष नेहमीच आपल्या अभ्यासूवृत्तीने चमकत असतो. त्याची राज्यस्तरीय कामगिरी नक्कीच उत्तम असेल त्याला मी व माझ्या संपूर्ण रायगड टीम कडून शुभेच्छा रोशन तांडेल, रायगड जिल्हा अध्यक्ष शिक्षक व शिक्षकेत्तर सेना महाराष्ट्र यांनी दिल्या.

# ज्ञानवर्धिनी हायस्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

सावळे येथील ज्ञानवर्धिनी हायस्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात झाले. या कार्यक्रमाला परिसरातील मान्यवरांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक केले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आणि प्रमुख पाहुणे म्हणून माजी सभापती गजानन माळी उपस्थित होते. तसेच इंडेमित्सू कंपनीचे मॅनेजर गोपाळ सुरवसे, काशीनाथ कांबळे, एम. डी. माळी, मुख्याध्यापक प्रशांत मोकल यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी रामभाऊ पाटील, जयदास पाटील, माजी प्राचार्य पी. एल. गायकवाड, घोडके सर, संचालक पालवे सर आणि प्राचार्य प्रकाश माळी यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

सरपंच प्रफुल्ल माळी, बळीराम कांबळे, या सोहळ्याला सावळे गावाचे पंचायत सदस्य, ग्रामस्थ, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. किशोर वावेकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# तंबाखूमुक्त शाळेसाठी उरणमधील शिक्षकांना प्रशिक्षण

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर, बातमीदार**

उरण येथील इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय, शिक्षण विभाग पंचायत समिती उरण, सलाम मुंबई फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत तालुक्यातील प्राथमिक आणि माध्यमिक शाळांच्या शिक्षकांचे एकदिवसीय प्रशिक्षण पंचायत समिती उरण येथे झाले.

प्रशिक्षणासाठी प्रमुख अतिथी इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. बाबासो काळेल, गटशिक्षणाधिकारी निर्मला घरत तर प्रशिक्षणासाठी मार्गदर्शक सलाम मुंबई फाउंडेशनच्या सारिका ब्राऊन, दंत शल्यचिकित्सक डॉ.संतोष झापकर अणि जिल्हा रुग्णालय अलिबागच्या तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाचे सुशील साईकर हे उपस्थित होते.



तंबाखूच्या व्यसनाचे प्रमाण वाढल्याने बऱ्याचदा उपचार घेण्यासाठी रूग्णांना दूरवर जावे लागते त्यामुळे आर्थिक अणि मानसिक त्रास होतो. यासाठी या कार्यशाळेतून शिक्षकांनी मुलाना आयुष्यभर तंबाखू अणि तंबाखूजन्य पदार्थांपासून दूर राहण्यासाठी निश्चिंतपणे मदत होईल तसेच समाजात जनजागृती होईल असे डॉ. बाबासो काळेल आपल्या मनोगतात म्हणाले.

तंबाखूचे दुष्परिणाम अणि त्यामुळे होणारे कॅन्सर तसेच कोटपा कायदा २००३ याविषयी सविस्तर माहिती डॉ. झापकर यांनी दिली. तर तंबाखू मुक्त शाळा याचे महत्त्व आणि नऊ निकश याच्याविषयी समर्पक माहिती सलाम मुंबईच्या सारिका ब्राऊन यांनी दिली.

# पनवेल मनपा निवडणूक : ४०० उमेदवारी अर्ज प्राप्त





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार पनवेल सार्वत्रिक निवडणूक गुरुवार, १५ जानेवारी २०२६ रोजी होत आहे, तर मतमोजणी व निकाल १६ जानेवारी २०२६ रोजी जाहीर होणार आहे. निवडणूक प्रक्रियेचा पहिला महत्त्वाचा टप्पा असलेल्या नामनिर्देशन प्रक्रियेला मंगळवार, २३ डिसेंबरपासून सुरुवात झाली होती, तर आज ३० डिसेंबर रोजी सांगता झाली. आजच्या उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत एकुण ४०० उमेदवारी अर्ज प्राप्त झाले आहेत.

यामध्ये मंगळवारी ३० डिसेंबर शेवटच्या दिवशी निवडणूक कार्यालय नावडे १, प्रभाग १, २ आणि ३ रोजी एकूण ७६ नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले. निवडणूक कार्यालय ०२ अ खारघर, प्रभाग ४,५,६ येथे एकूण ५२ नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले.

निवडणूक कार्यालय ०३ ब कळंबोली, प्रभाग ७,८,९,१० येथे एकूण ७७ नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले. निवडणूक कार्यालय ०४ क कामोठे, प्रभाग ११,१२,१३ येथे एकूण ६० नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले. निवडणूक कार्यालय ०५, ड पनवेल प्रभाग १४,१५,१६ येथे एकूण ५२ नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले निवडणूक कार्यालय ०६, ड पनवेल-२ प्रभाग १७,१८,१९,२० येथे एकूण ५४ नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले.

३० डिसेंबर रोजी एकूण सहा निवडणूक निणर्य अधिकारी कार्यालयातून ३७१ नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले आहेत. तसेच २९ डिसेंबर रोजी एकुण २९ नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले होते. दोन दिवसात एकुण ४०० पत्र प्राप्त झालेत.

नामनिर्देशनपत्रांची छाननी बुधवार, ३१ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजल्यापासून सुरू होणार आहे. वैधरीत्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी छाननीनंतर प्रसिद्ध केली जाईल. उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा अंतिम दिनांक शुक्रवार, २ जानेवारी असून, सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंतची वेळ देण्यात आली आहे. तर, शनिवार, ३ जानेवारी रोजी निवडणूक चिन्हांचे वाटप करण्यात येणार असून, त्याच दिवशी अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध होणार आहे.

# नवीन पनवेल येथे उद्या श्री श्री अय्यप्पा महापूजा

**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेल येथील श्री वृंदावन बाबा अय्यप्पा भक्तवृंदा आणि श्री वृंदावन बाबा भजन मंडळी यांच्या तर्फे २१वी श्री श्री अय्यप्पा महापूजा गुरुवार, १ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता आयोजित करण्यात आली आहे.

या महापूजेत सकाळी ६.०० ते ७.०० वा., श्री महागणपती होम सकाळी ९.३० ते १२.३० वा., भजन कार्यक्रम (श्री वृंदावन बाबा भजन मंडळ) दुपारी १२.३० वा, महामंगल आरती त्यानंतर तीर्थप्रसाद वाटप आणि सार्वजनिक महाप्रसाद दुपारी १.०० वा, सायं. ५.०० वा., यक्षागाना बयालाटा असे कार्यक्रम होणार आहे. तरी सर्व भक्तगण या शुभकार्याला उपस्थित राहुन कार्यक्रमाची शोभा वाढवावी व तिर्थप्रसादाचा लाभ घ्यावा, अशी नम्र विनंती आयोजकांतर्फे करण्यात आली संत स्वामी श्री वृंदावनबाबा समाधी मंदिर सेक्टर ५/ए, गुरुद्वारामागे, नवीन पनवेल (पू.) ४१० २०६.येथे ही महापूजा संपन्न होणार आहे.

# 'थर्टीफर्स्ट'साठी प्रशासन सज्ज

**उरण : वार्ताहर**

उरणसह परिसरात नववर्षाच्या स्वागतासाठी ३१ डिसेंबर रोजी होणाऱ्या पार्ट्या मद्यप्राशन व गैरप्रकार रोखण्यासाठी उरण परिसरात पोलीस प्रशासन सज्ज झाले आहे, अशी माहिती उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनीफ मुलानी यांनी दिली

उरण चारफाटा, नवघर फाटा, पिरवाडी समुद्रकिनारा आदी ठिकाणी नाका बंदी करण्यात येणार आहे. अनुचित प्रकार आढळून आल्यास कारवाई केली जाणार असून नियमभंग केल्यास दंड ठोठावला जाणार आहे. बंदोबस्त कडक ठेवण्यात येणार आहे. त्यात २ पी आय, १० अधिकारी, ३५ कर्मचारी बीट मार्शल, पेट्रोलिंग केले जाणार आहे.



**पनवेल : भाजप महायुतीचे उमेदवार इक्बाल काझी यांनी प्रभाग १४मधून आपला उमेदवारी अर्ज भरला.**

# वरसे ग्रामपंचायत हद्दीत कचऱ्याचा प्रश्न गंभीर



**धाटाव : प्रतिनिधी**

सर्वाधिक मोठी, बहुचर्चित वरसे ग्रा.पं.चा कारभार पुन्हा नव्याने नियोजनशून्य झाल्याचे समोर आले. वाडीपाडा वस्तीत जिकडे तिकडे कचराच कचरा दिसत आहे. शिल्प नगरीचा रस्ता अक्षरशः डंपिंग ग्राऊंडचा ताबा घेत आहे कालवा, ओहळ कचऱ्याने तुडुंब भरलेत.

अनेक वस्तीसह निवीचा गटार घाणीने तुडुंब भरल्याने नागरिकांना दुर्गंधीशी सामना करावा लागतो. दुसरीकडे डंपिंग ग्राऊंडचा कचरा सर्वत्र माळरानावर पसरल्याचे भयान दृश्य पाहता सामाजिक आरोग्य धोक्यात येणार? अशी घंटी वाजत आहे. गटार साफसफाई, रस्ता दुतर्फा कचऱ्याबाबत वारंवार तक्रारी करूनही कोणीच लोकप्रतिनिधी, प्रशासन अधिकारी गांभीर्याने लक्ष देत नाहीत, असे नागरिकांचे म्हणणे आहे.

दरम्यान, झोपडपट्टी कालवा रस्त्यावरील खड्ड्यांमुळे नागरिकांना अक्षरशः कसरत करावी लागते. ग्रामसभेत खड्डे भरण्याबाबत निर्णय होऊनही अद्याप भरलेले नाहीत असा संताप नागरिकांत असतानाच कचऱ्याचाही प्रश्न अधिकच गंभीर होत आहे. अशात ढिम्म प्रशासनावर आजतरी कोणातचेच अंकुश राहिलेले दिसत नाही. त्यामुळे कचरा प्रश्न यासह विविध समस्यांनी वरसे ग्रां.पं.त पुन्हा चर्चेत आली आहे.

तालुक्यात वरसे ग्रा. पं.त नीटनेटकी होण्याचे संकेत असतानाच मुख्यतः घनकचरा समस्यांनी पुन्हा नियोजन कोडमडले. प्रशासनावर कोणतेच अंकुश नाही. त्यामुळे रस्त्यांत खड्डे, घनकचऱ्याकडे नेहमीच दुर्लक्ष केले जाते. यातच भुवनेश्वर निवी रस्त्याच्या दुतर्फा रस्ता, नैसर्गिक ओहळ, कालवा कचऱ्याने फुल टू भरला आहे. शिल्प नगरी समोरील रस्त्याला डंपिंग ग्राऊंडचे स्वरूप आले. प्राचीन शंकराच्या मंदिर समोरील कालवा कृत्रिम कचऱ्याने विद्रूप दिसत आहे. काही बेशिस्त नागरिकांमुळे सार्वत्रिक ठिकाण कचऱ्याचे अड्डे झालेत.

निवी हद्दीतील डंपिंग ग्रांऊडमधील कचरा रस्ता, माळरानावर सर्वत्र पसरल्याने परिसराला विद्रोपीकरण आले. दिवसभर गुरे, डुकरे, कुत्र्यांचा उच्छांद वाढल्याने सामाजिक स्वास्थ धोक्यात आले. याकडे लोकप्रतिनिधी, ग्रामसेवक प्रशासन लक्ष देत नाही अशी स्पष्ट नाराजी नागरिकांनी व्यक्त केली.

**वरसे ग्रामपंचायततील हद्दीतील नागरिकांनी रस्त्यावर कचरा टाकू नये हे चुकीची गोष्ट आहे तसेच सदर कचऱ्याला रस्त्यालगत कचरा आहे तो कचरा उचलण्यासाठी ग्रामपंचायतचे घंटागाडी फिरत असते कचरा उचलण्याचे काम करत असते, परंतु केव्हातरी कामगार आले नसल्यामुळे कचरा वाचून राहतो. यापुढे दक्षता घेतली जाईल, असे वरसे ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक अहिरे यांनी सांगितले.**

**–अहिरे, ग्रामसेवक, वरसे ग्रामपंचायत**

## ठाकरे गटाचे कार्यकर्ते विजय धामणे शिंदेसेनेत

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे विभागातील उबाठाचे निष्ठावंत कार्यकर्ते विजय धामणे यांनी नुकताच मंत्री भरत गोगावले यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला. युवा नेते सचिन भोसले, शिवसेना नागोठणे विभाग प्रमुख प्रविण ताडकर, शिवसेना नागोठणे शहर प्रमुख संतोष चितळकर व शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

विजय धामणे यांच्या शिवसेनेतील प्रवेशामुळे कोंडगाव ग्रामपंचायत परिसरातील शिवसेनेला (उबाठा) फार मोठा धक्का बसला असून शिवसेनेत (शिंदे) प्रवेशाचा सिलसिला वेगाने चालू असल्यामुळे विभागातील शिवसेनेला (उबाठा) चांगलीच गळती लागली असून कालांतराने नागोठणे विभागात शिवसेनेचे बोटावर मोजता येतील तेवढेच कार्यकर्ते शिल्लक राहतील असे चित्र निर्माण झाले आहे.

दरम्यान, विजय धामणे यांच्या प्रवेशामुळे नागोठण्यातील शिवसेनेत उत्साह निर्माण झाला असून पक्षाला चांगली बळकटी मिळणार आहे तसेच पक्ष संघटना मजबूत करण्यात देखील मदत होणार असल्याचा विश्वास शिवसेना उपतालुका प्रमुख मनोज खांडेकर यांनी व्यक्त केला आहे.



## मच्छीमार जेट्टीचे दुरूस्ती, नूतनीकरणांनतर लोकार्पण

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील नवेदर नवगाव येथील मच्छीमार जेट्टीच्या दुरुस्ती आणि नूतनीकरणांनतरचे लोकार्पण सोमवारी (दि.२९) आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते करण्यात आले. साडेसहा कोटी रूपये खर्चून जेटीची दुरूस्ती करण्यात आली आहे. या वेळी मच्छीमार बांधवांना सुरक्षा जॅकेटसचे वितरण करण्यात आले.



या वेळी शिवसेनेच्या जिल्हा परीषदेतील माजी गटनेत्या मानसी दळवी, माजी सभापती दिलीप भोईर, भाजपच्या भटक्या विमुक्त सेलचे प्रदेश सरचिटणीस राजू साळुंखे यांच्यासह स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. या वेळी कोळी बांधवांनी आमदार महेंद्र दळवी यांची वाजत गाजत मिरवणूक काढली.

नवगाव येथील कोळी बांधवांसाठी जेटीच्या दुरूस्तीची नितांत गरज होती. जेटी नादुरूस्त असल्याने त्यांना समुद्रात बैलगाडी घेवून जावून मासळी उतरवण्याची वेळ आली होती. आज त्यांच्या मागणीनुसार अद्यावत जेटी तयार करून दिली आहे. त्यामुळे त्यांच्यासाठी मोठी सुविधा निर्माण झाली असून मासळी उतरवणे सुलभ झाले आहे. जेटीकडे येणारया रस्त्याचेही भूमीपूजन करण्यात आले आहे. आगामी काळात अलिबाग, मुरूड तालुक्यात आणखी काही नवीन जेटी उभारण्याबरोबरच जुन्या जेटींची दुरूस्ती केली जाणार असल्याचे आमदार महेंद्र दळवी यांनी सांगितले.

माजी सभापती दिलीप भोईर यांनी महेंद्र दळवी यांचे आभार मानले. गेली अनेक वर्षे हा मतदार संघ विकासापासून दूर होता, परंतु आमदार दळवी यांच्या माध्यमातून अलिबाग मतदार संघाचा विकास होत आहे आणि यापुढेही होत राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. राजू साळुंखे यांनीही आपल्या भाषणात दळवी यांच्या कामगिरीचे कौतुक करताना शेकाप नेतृत्वावर टीका केली.

या जेटीची दुरूस्ती आणि नूतनीकरण केल्यामुळे स्थानिक मच्छीमार बांधवांनी समाधान व्यक्त केले आहे. त्यांनी आमदार महेंद्र दळवी यांचे आभार मानत सत्कार केला. परीसरातील कोळी बांधव भगिनी यावेळी मोठया संख्येने उपस्थित होते. या वेळी प्रमुख पाहुण्यांनी खास कोळी समाजाचा पारंपारीक वेश परीधान केला होता.

## तळा येथे कुणबी भवनाचे उद्‌घाटन

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील कुणबी समाजासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या कुणबी भवनाचे भव्य उद्‌घाटन प्रदेशाध्यक्ष राष्ट्रवादी तथा खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते उत्साहात पार पडले.

या सोहळ्यास महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. अध्यक्षस्थानी तळा तालुका कुणबी समाजाचे तालुकाध्यक्ष नामदेव काप होते, तर स्वागताध्यक्ष म्हणून मुंबई तळा तालुका शाखेचे अध्यक्ष यशवंत शिंदे यांनी भूमिका बजावली. या वेळी समाजनेते रवींद्र माडंवकर, तळा नगराध्यक्षा माधुरी घोलप, उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, जिल्हा ओबीसी संघटनेच्या महिला अध्यक्षा अक्षरा कदम, मुंबई युवक अध्यक्ष विजय घाडगे यांच्यासह संघ कार्यकारिणी सदस्य हरिचंद्र म्हातले, जनार्दन शिगवण, अशोक करंजे, यशवंत मोंढे, सुरेश कावणकर, कृष्णा सुर्वे, रायगड जिल्हा कुणबी समाजाचे सचिव सचिन कदम तसेच श्रीमती लिला पुतलाजी जाधव, कुणबी समाज बांधव आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



खासदार सुनील तटकरे यांनी आपल्या भाषणात कुणबी समाजाच्या सामाजिक एकतेवर व विकासात्मक वाटचालीवर भर दिला. कुणबी भवन हे केवळ इमारत नसून समाजाच्या सांस्कृतिक, शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांचे केंद्र ठरेल, असे त्यांनी सांगितले. तळा तालुक्यातील समाजबांधवांनी एकत्र येऊन हा उपक्रम साकार केला, ही अभिमानास्पद बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. भविष्यातही समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण सदैव पाठबळ देऊ, अशी ग्वाही त्यांनी दिली.

मंत्री अदिती तटकरे यांनी कुणबी भवनाच्या माध्यमातून समाजातील महिला, युवक व विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबविण्याची संधी उपलब्ध होणार असल्याचे सांगितले. समाजाने शिक्षण, एकोपा व सामाजिक बांधिलकी जपली तर प्रगती निश्चित आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

## 'कमळ'तर्फे नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार

**अलिबाग :** कमळ नागरी सहकारी पत संस्थेचे सदस्य असलेल्या अलिबाग नगर परिषदेत निवडून आलेल्या नवनिर्वाचित नगरसेवकांचा गुरुवारी (दि.१) कमळ पतसंस्थेतर्फे सत्कार करण्यात येणार आहे.

गुरुवारी सायंकाळी ५.०० वाजता सतिश धारप डायलिसिस सेंटर श्रीबाग, शेजारील मैदानात हा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे. रघुजी राजे आंग्रे या सत्कार समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

समीर मधुकर ठाकूर, ॲड. अश्विनी ऋषिकेश ठोसर, ॲड. मानसी संतोष म्हात्रे, ॲड. निलम किशोर हजारे, अनिल रमेशचंद्र चोपडा, शैला शेषनाथ भगत या नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार करण्यात येणार आहे, अशी माहिती कमळ नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष नंदकुमार चाळके यांनी दिली.

## नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी स्वीकारला पदभार

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान नगर परिषदेची निवडणूक नुकतीच झाली. या निवडणुकीत महायुतीचे थेट नगराध्यक्ष पदाचे उमेदवार चंद्रकांत चौधरी यांनी १०६८ इतक्या मोठ्या मताधिक्यानी येथे विजय प्राप्त केला. यामुळे माथेरान नगर परिषदेवर पुन्हा एकदा भगवा झेंडा फडकला आहे.

माथेरान नगर परिषदेचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी मंगळवारी (दि.३०) आपला पदभार स्वीकारला असून माथेरान नगर परिषद मुख्याधिकारी राहुल इंगळे यांच्या हस्ते नगराध्यक्ष चौधरी यांचा सत्कार करण्यात आला आणि त्यांना नगराध्यक्ष पदाचा कार्यभार सुपूर्त करण्यात आला.



विरोधकांनाही सोबत घेऊन काम करू असेदेखील त्यांनी या वेळी सांगितले. या पदग्रहण कार्यक्रमास शिवसेना शहर प्रमुख मनोज खेडकर, भाजप शहर अध्यक्ष प्रवीण सकपाळ, उपशहर प्रमुख प्रमोद नायक, प्रकाश सुतार, शेकापचे उमेश कदम, संपर्क प्रमुख निखिल शिंदे, युवा प्रमुख राकेश कोकळे तसेच महिला आघाडीच्या सर्व पदाधिकारी तसेच माथेरानमधील नागरिक नवनिर्वाचित नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी व विजयी नगरसेवक, नगरसेविका यांना शुभेच्छा देण्यासाठी मोठ्या संख्येने या वेळी उपस्थित होते.

**माथेरानमधील नागरिकांनी चोखंदळपणे मतदान करून थेट नगराध्यक्षपदी मोठया मताधिक्याने मला विजयी केल्याबद्दल मी आपला सदैव ऋणी राहीन. तर माथेरान मधील नागरिकांनी महायुतीच्या बाजूने कौल दिल्यामुळे आम्ही सगळे जण सत्तास्थानी बसलो आहे.**

**–चंद्रकांत चौधरी, नगराध्यक्ष, माथेरान**

## सार्वजनिक स्वच्छतागृहांसाठी रोहा ब्राह्मण मंडळातर्फे निवेदन

**रोहा : प्रतिनिधी**

ब्राह्मण मंडळ रोहा कमिटी तर्फे मंगळवार (दि.३०) रोजी नवनिर्वाचित नगराध्यक्ष वनश्री समीर शेडगे यांची भेट घेण्यात आली व श्री ओंकारेश्वर मंदिराजवळ असलेल्या काळे उद्यानात पुरुष व महिलांसाठी दोन स्वतंत्र स्वछतागृह तयार करून देण्यासाठी निवेदन देण्यात आले. शेडगे यांनी लक्ष घालण्याचे अभिवचन देऊन मागणीसंबंधी सकरात्मक प्रतिसाद दिला आहे.

स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध झाल्यास श्री ओंकारेश्वर मंदिरात कार्यक्रमाच्या वेळी होणारी गैरसोय दूर होईल. मंदिर परिसरातच प.पु. पांडुरंगशास्त्री आठवले यांचे निवासस्थान येत असल्याने स्वाध्याय परिवारातील लोकं या भागात येतात त्या लोकांनाही या स्वछतागृहांचा उपयोग होईल. निवेदन देतेवेळी ब्राह्मण मंडळ रोहा अध्यक्ष अमित आठवले, सचिव निखिल दाते, सदस्य स्वाती पेंडसे, स्मृती जोशी, राजश्री आठवले, प्रज्वल बापट, प्रतीक पाटणकर, विजय जोशी, अविनाश गुळवणी, जयेश गोडबोले उपस्थित होते.

## 'मुरूड समुद्र किनाऱ्यास ब्लू फ्लॅगचे नामांकन मिळण्यासाठी प्रयत्न करणार'

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड शहरात आतंरराष्ट्रीय पर्यटक येण्यासाठी व पर्यटकांचा ओघ वाढण्यासाठी मुरुड समुद्र किनाऱ्यास ब्लू फ्लॅगचे नामांकन मिळणे खूप गरजेचे आहे. श्रीवर्धन प्रमाणेच मुरुड समुद्र किनाऱ्यास ब्लू फ्लॅगचे नामांकन मिळण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपदान राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी मुरूड येथे केले आहे.

मुरूड नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत थेट नगराध्यक्ष म्हणून आराधना दांडेकर या मोठ्या मताधिक्याने निवडून आल्या होत्या. नगराध्यक्ष पदाच्या पदग्रहण समारंभाप्रसंगी त्या आपल्या मार्गदर्शन पर भाषणात बोलत होत्या.



या वेळी माजी आमदार अनिकेत तटकरे, अलिबाग मुरूड विधासभा क्षेत्राचे विधासभा अध्यक्ष अमित नाईक, उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे, मुरूड तालुका अध्यक्ष फैरोज घलटे, मुरूड तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन मनोज भगत, मुख्याधिकारी सचिन बच्छाव, जिल्हा उपाध्यक्ष मंगेश दांडेकर, माजी जिल्हा परिषद सदस्य सुबोध महाडिक, जिल्हा सोशल मीडिया सेलचे उपाध्यक्ष हसमुख जैन, नांदगाव ग्रामपंचायतचे माजी सरपंच भाई सुर्वे, माजी सरपंच मनीष नांदगावकर, माजी सरपंच अजित कासार, माजी जिल्हा परिषद सदस्य नम्रता कासार, नगरसेवक रूपेश पाटील, नगरसेविका प्रांजली मकू, प्रीता चौलकर, प्रमिला माळी, आदेश दांडेकर, श्रद्धा अपराध आदीसह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

मुरूड नगर परिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष आराधना दांडेकर यांनी आज औपचारिकरित्या आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला.

या सोहळ्यास महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे तसेच माजी आमदार अनिकेत तटकरे यांनी विशेष उपस्थिती लावून नवनिर्वाचित नगराध्यक्ष आराधना दांडेकर यांना पुष्पगुछ देऊन अभिनंदन केले.

पदभार स्वीकारल्यानंतर बोलताना नगराध्यक्ष आराधना दांडेकर म्हणाल्या की, मुरूड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी पारदर्शक, लोकाभिमुख आणि समन्वयाने काम करण्याचा माझा संकल्प आहे. पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, आरोग्य व महिला–सशक्तीकरण या बाबींना प्राधान्य देण्यात येईल. जनतेने दिलेल्या विश्वासाला कधीही तडा जाऊ देणार नाही.

## पत्रकार अरुण पवार यांना पुरस्कार जाहीर

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथील अभ्यासू व निर्भीड ज्येष्ठ पत्रकार रायगड भूषण पुरस्कार प्राप्त अरुण तुकाराम पवार यांना पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल स्व. माजी आ. मधुशेठ ठाकूर चॅरिटेबल ट्रस्ट अलिबाग, भाई जगताप मित्रमंडळ रायगड, ॲड.उमेश ठाकूर मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने कुलाबा जीवन गौरव राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला आहे.

या पुरस्काराचे वितरण शनिवार, ३ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी सायंकाळी ५:३० वाजता मु.सातिर्जे, ता.अलिबाग या ठिकाणी होणाऱ्या भव्य दिव्य अशा कार्यक्रमात करण्यात येणार असून त्या संदर्भातील अभिनंदनपर निवडपत्र पत्रकार अरुण पवार यांना निवड समितीचे अध्यक्ष श्रेयश घरत, उपाध्यक्ष आकाश घरत, आकाश राणे, सूत्रसंचालक धनंजय भगत, सल्लागार मंगेश घोणे, चिटणीस स्वप्निल भोईर यांनी आपल्या सहीनिशी दिले आहे.

माणगाव येथील पत्रकार अरुण पवार हे गेली ४० वर्ष पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असून त्यांनी रायगड जिल्ह्यातील तसेच माणगाव तालुक्यातील विविध प्रश्न, समस्या यांवर आवाज उठून आपल्या धारदार अशा अभयसंपुर्ण व निर्भीड लेखणीने अनेक समस्या मार्गी लावल्या आहेत. या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून केंद्रप्रमुख शंकर शिंदे यांनी अरुण पवार यांचे अभिनंदन केले.




## कर्जतमध्ये रंगला आदिवासी कला महोत्सव

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील पोशीर ग्रामपंचायत मधील चिंचवाडी येथे 'वडाखालची शाळा' या उपक्रमांतर्गत ठाकर आदिवासी कला महोत्सव आयोजित करण्यात आला होता. सहा दिवसांच्या या कला महोत्सवात आदिवासी कला संस्कृती विषयी विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

'वडाखालची शाळा' संकल्पनेतून ठाकर आदिवासी वाडीत सहा दिवसांचा कला महोत्सव आयोजन पोशीर ग्रामपंचायत मधील चिंचवाडी येथे करण्यात आले होते. मेघा आणि यश (कॅम्पर शेफ) यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवला जात आहे. त्याचाच पुढचा टप्पा म्हणून या भागात प्रथमच असा कला महोत्सव आयोजित करण्यात आला.

या कला महोत्सवात देवपाडा, उंबरवाडी, गिरेवाडी आणि वाघ्यावाडी येथील शाळांमधील मुलांनीही सहभाग घेतला. विविध कला, खेळ आणि सादरीकरण यामधून मुलांनी प्रचंड आनंद घेतला.



वडाखालची शाळा या ठाकर आदिवासी कला महोत्सवाला बाहेरून येणाऱ्या पाहुण्यांपेक्षा वाडीतल्या स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. आदिवासी मुलांनी स्वतःच्या हातांनी तयार केलेल्या विविध कलावस्तू, नैसर्गिक रंग व स्थानिक साहित्याचा वापर करून संपूर्ण परिसर आकर्षक पद्धतीने सजवला होता. 'वडाखालची शाळा' या संकल्पनेनुसार शिक्षण, कला आणि निसर्ग यांचा सुंदर संगम या महोत्सवात पाहायला मिळाला. चिंचवाडी मधील कार्यकर्ते मनोहर पारधी आणि नारायण पारधी यांनी पखवाज आणि हार्मोनियम वादन सादर करून उपस्थितांची दाद मिळवली.

मुलांना विविध कला शिकवण्यासाठी देशाच्या विविध भागांतून कलाकार आणि मार्गदर्शक उपस्थित होते. रॉक बॅलन्सिंग कलेसाठी प्रसिद्ध असलेले गौतम वैष्णव यांनी दगड संतुलन कलेचा अनुभव दिला. ११ वर्षांचा वृक्ष याने इलेक्ट्रिक गिटार आणि पियानो वाजवून दाखवत थ्रीडी चित्रकलेबाबत मार्गदर्शन केले. सिद्धी यांनी मुलांसाठी मातीची घडण (क्ले मॉडेलिंग) कार्यशाळा घेतली.

### १९ वर्षाखालील मुलांची क्रिकेट स्पर्धा

# उरण असोसिएशन संघ विजेता

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या १९ वर्षाखालील मुलांच्या एकदिवसीय ४० षटकांच्या निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेत उरण क्रिकेट स्पोर्ट्स असोसिएशन संघाने विजेतपद पटकावले.

अंतिम सामना पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर भेंडखळ क्रिकेट अकॅडमी विरुद्ध उरण क्रिकेट स्पोर्ट्स असोसिएशन या दोन संघांमध्ये खेळला गेला. त्यामध्ये उरण संघाने भेंडखळ क्रिकेट अकॅडमी संघाचा सात गडी राखून पराभव केला.

प्रथम फलंदाजी करताना भेंडखळ संघाने ३१.४ षटकांमध्ये सर्व गडी गमावत १३२ धावा केल्या होत्या. त्यामध्ये दक्ष पाटील याने सर्वाधिक ४९ धावांची खेळी केली. उरण संघाकडून आयुष पाटीलने तीन, तर स्मित पाटील व तनिष्क पुजारी यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले.



१३३ धावांचे लक्ष घेऊन फलंदाजीसाठी आलेल्या उरण स्पोर्ट्स संघाने २०.३ षटकांमध्ये तीन गडी गमावत १३३ धावांचे लक्ष्य पूर्ण केले. त्यामध्ये स्मित पाटील याने सर्वाधिक ४३, तर यजुर्व ठाकूर यांनी ३४ धावा करून संघाला विजय मिळवून दिला. भेंडखळ संघाकडून विस्मय बल्लाळ याने दोन फलंदाज बाद केले.

उरण असोसिएशन संघाचा खेळाडू स्मित पाटील हा स्पर्धेचा मानकरी व उत्कृष्ट फलंदाज ठरला. चॅम्पियन्स क्रिकेट अकॅडमी खारघर संघाचा ओम भोईरची उत्कृष्ट गोलंदाज म्हणून, तर उत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून भेंडखळ अकॅडमीचा श्लोक कोळी याची निवड करण्यात आली.

विजेत्या आणि उपविजेत्या संघांना पॅक ऐट कंपनीचे मालक प्रवीण शिंदे, रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सदस्य प्रदीप खलाटे, पेण स्पोर्ट्सचे सदस्य श्याम पाटील, रवींद्र पाटील, शेखर भगत, अभिषेक खातू, भेंडखळ क्रिकेट अकॅडमीचे प्रशिक्षक शरद म्हात्रे, उरण स्पोर्ट्स असोसिएशनचे व्यवस्थापक अमेय पाटील, पंच एजाज मारूफ, रमेश ढाकोळ, आदेश नाईक यांच्या हस्ते चषक व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

# दांडा समुद्र किनाऱ्यावर याटिंग स्पर्धेचा थरार

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील दांडा समुद्रकिनाऱ्यावर महाराष्ट्र याटिंग असोसिएशनने नुकतेच हिवाळी प्रशिक्षण शिबिर आणि राज्यस्तरीय स्पर्धा उत्साहात झाली. या दोन्हींमध्ये संपूर्ण महाराष्ट्रातून अनेक प्रतिभावान खलाशांनी सहभाग घेतला, ज्यामुळे कौशल्य विकास आणि स्पर्धात्मक नौकानयनासाठी व्यासपीठ उपलब्ध झाले.

पाच दिवसांच्या शिबिरात तरुण आणि अनुभवी सहभागींनी तज्ज्ञ प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या नौकानयन तंत्रांवर, सागरी ज्ञानावर आणि शारीरिक तंदुरूस्तीवर लक्ष केंद्रित केले. या गहन प्रशिक्षणाने राज्यस्तरीय स्पर्धेसाठी उत्तम तयारी करून घेतली, ज्यामुळे महाराष्ट्रातील याटिंग प्रतिभा उच्च स्तरावर स्पर्धा करण्यास सज्ज झाली आहे.






ही राज्यस्तरीय स्पर्धा ऑप्टिमिस्ट आणि टेक्नो २९३ या लोकप्रिय वर्गासह विविध श्रेणींमध्ये रोमांचक शर्यतींची साक्षीदार ठरली. राज्य क्रमवारी सुधारू पाहणाऱ्या आणि राष्ट्रीय स्पर्धांसाठी पात्र होऊ इच्छिणाऱ्या खलाशांसाठी ही स्पर्धा अत्यंत महत्त्वाची होती.

### स्व. उमेश शेनॉय चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा

# सिद्धार्थ मंडळ, संघर्ष मंडळ, डॉन बॉस्को संघांची विजयी सलामी

**मुंबई : प्रतिनिधी**

सिद्धार्थ मंडळ, संघर्ष मंडळ, डॉन बॉस्को यांनी अमरहिंद मंडळ आयोजित स्व. उमेश शेनॉय चषक राज्यस्तरीय कुमार कबड्डी स्पर्धेत विजयी सलामी दिली. विजय क्लब विरुद्ध श्री स्वामी समर्थ हा सामना बरोबरीत सुटला, तर गुड मॉर्निंग स्पोर्ट्सने पहिल्याच दिवशी दोन विजय मिळवीत बाद फेरीतील आपला प्रवेश निश्चित केला.

मुंबईतील दादर (प.)येथील मंडळाच्या पटांगणावर पहिल्या दिवशी झालेल्या ड गटातील चुरशीच्या सामन्यात मुंबई शहरच्या विजय क्लबने ठाण्याच्या श्री स्वामी समर्थ मंडळा ३६–३६ असे बरोबरीत रोखले. राजेश गुप्ता, अमेय खांडेकर, शिवम यादव यांनी विजयकडून उत्कृष्ट खेळले.



फ गटात ठाण्याच्या डॉन बॉस्कोने जिनसिंग, मयुरेश वाघ, राज सोनावणे, ध्रुव लोखंडे यांच्या चढाई पकडीच्या सर्वोत्तम खेळाच्या जोरावर मुंबई शहरच्या आकांक्षा मंडळावर ४७–२९ अशी सहज मात करीत साखळीत पहिल्या विजयाची नोंद केली.

मुंबई शहरच्या गुड मॉर्निंग स्पोर्ट्सने क गटात गटात सलग दोन विजय मिळविले. प्रथम त्यांनी उपनगरच्या श्री सिद्धिविनायक मंडळाला ३५–३० असे, तर त्यानंतर मुंबई शहरच्या गोल्फदेवीला ४८–४० असे पराभूत करीत बाद फेरी गाठली. विवेक गवळी, आयुष पवार, दिवेश गवळी, विनय बंबोरे यांच्या चढाई पकडीच्या चतुरस्त्र खेळाने ही किमया साधली. रत्नागिरीच्या संघर्ष मंडळाने ड गटात पालघरच्या इच्छाशक्ती मंडळाला ४५–३४ असे नमविले. शैलेश रोडगे, रोशन चिपळूणकर, शुभम नवरंग यांच्या उत्कृष्ट खेळाला या विजयाचे श्रेय जाते. उपनगरच्या सिद्धार्थ मंडळाने ब गटात मुंबई शहरच्या नवोदित मंडळाला ५३–५२ असे चकवत आगेकूच केली. नरेश चव्हाण, संकेत यादव अमरराज यांनी सिद्धार्थकडून उत्तम खेळ केला.

# रायगडात मुलींच्या क्रिकेट स्पर्धेला प्रारंभ

### पहिल्याच सामन्यात यजमान संघाने मारली बाजी; दमदार कामगिरी



**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन (एमसीए)च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या १९ वर्षाखालील मुलींच्या एकदिवसीय ५० षटकांच्या क्रिकेट स्पर्धेला रायगड जिल्ह्यातील छत्रपती शिवाजी महाराज मैदान पेण, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिक्युरिटी मार्केट्स रसायनी–पाताळगंगा क्रीडांगण व छत्रपती शिवाजी महाराज मैदान गव्हाण–उलवे, पनवेल अशा तीन मैदानांवर सुरुवात झाली आहे.

ग्रुप एचमधील रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए) च्या संघासह सातारा, सिंधुदुर्ग, बास क्रिकेट क्लब पुणे, ज्युडिशियल क्रिकेट अकॅडमी, चंद्रोस क्रिकेट क्लब अशा सहा संघांचा समावेश असणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज मैदान पेण येथे रायगडच्या मुलींच्या संघाचा सामना बास क्रिकेट अकॅडमी पुणे संघाबरोबर झाला. त्यामध्ये रायगडने पुणे संघांचा ११५ धावांनी पराभव करत स्पर्धेला विजयाने सुरुवात केली.

प्रथम फलंदाजी करताना रायगडच्या मुलींच्या संघाने ४९ षटकांमध्ये सहा गडी गमावत १९८ धावा केल्या होत्या. त्यामध्ये भ्रताती राय हिने सर्वाधिक ३६, स्वरा बामगुडे ३४, तर संस्कृती पालकरने २८ धावांचे योगदान संघाला दिले. बास क्रिकेट अकॅडमी संघांचा डाव अवघ्या ८३ धावसंखेवर गडगडला. रायगडकडून गार्गी साळुंके व समिधा तांडेल यांनी प्रत्येकी चार फलंदाजांना बाद करत आपल्या संघाला ११५ धावांनी दणदणीत विजय मिळवून दिला.

आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, पेण नगर परिषदेच्या नवनिर्वाचित नगरसेविका मालती म्हात्रे, पेण स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष अरुण शिंदे यांच्या उपस्थितीत सामन्याला सुरुवात करण्यात आली. सर्वांनी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.





## पनवेलमध्ये भाजप महायुतीचे शक्तिप्रदर्शन















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com